## पंतप्रधानांच्या दौऱ्यासाठी शासकीय यंत्रणांची लगबग



**नवी मुंबई :** अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूच्या लोकार्पणासाठी येणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यासाठी शासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. अटल सेतूचे लोकार्पण येत्या शुक्रवारी म्हणजेच १२ जानेवारी रोजी पंतप्रधान मोदींच्या हस्ते होणार आहे. यानिमित्ताने उलवे येथील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जागेत मुख्य कार्यक्रम होणार आहे. यासाठी सिडको, नवी मुंबई महापालिका, पनवेल महापालिका कामाला लागली आहे. अटल सेतू लोकार्पण कार्यक्रमातच पंतप्रधानांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे उरण ते खारकोपर लोकलला हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे तसेच नवी मुंबई मेट्रो लाईन क्र. १ प्रकल्पाचेही होणार आहे. या सर्व सोहळ्याची शासकीय स्तरावर जोरदार तयारी सुरू आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १७४

www.ramprahar.com

बुधवार, १० जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


२२ जानेवारीला मांसाहार, दारूविक्री बंदीची मागणी/३

पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त/६

शैलेश स्मृती तरघर संघ 'युएनपीएल'चा विजेता/८


# शिवसेना आमदार अपात्रतेप्रकरणी आज निकाल; महाराष्ट्रासह देशाचे लक्ष

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेच्या फुटीनंतर दोन्ही गटांकडून एकमेकांचे आमदार अपात्र करण्यासंदर्भात विधानसभा अध्यक्षांकडे याचिका दाखल करण्यात आली होती. या प्रकरणावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर बुधवारी (दि.१०) निकाल देणार आहेत. या निकालाकडे महाराष्ट्रासह देशाचे लक्ष लागले आहे.

मे २०२३मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आमदार अपात्रतेचे प्रकरण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सुपूर्द केले. त्यानंतर जून महिन्यापासून या प्रकरणी नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी सुरू झाली. या कालावधीत पावसाळी आणि हिवाळी अधिवेशन उलटून गेले तरीही सुनावणी पूर्ण होऊ शकली नाही. ३१ डिसेंबरपर्यंत सुनावणी पूर्ण करून निकाल लावण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते, परंतु या कालावधीत सुनावणी पूर्ण न झाल्याने वेळ वाढवून देण्याची मागणी करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने ही मागणी दहा दिवसांनी वाढवून देऊन आता १० जानेवारीपर्यंत अल्टिमेटम दिला होता.



दरम्यान, शिवसेना आमदार अपात्रतेप्रकरणी निकाल देण्यापूर्वी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात झालेल्या भेटीवर शिवसेना उद्धव ठाकरे गटाने आक्षेप घेतला आहे. ठाकरे यांच्या शिवसेनेने याबाबत सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. यावर नार्वेकर यांनी स्पष्टीकरण देत मुख्यमंत्र्यांच्या भेटीमागील कारण सांगितले आहे.

विधानसभा अध्यक्षांची कोणकोणती कामे असतात, ते कोणत्या कारणास्तव मुख्यमंत्र्यांना भेटू शकतात याची कल्पना माजी मुख्यमंत्र्यांना असायला हवी. ज्या वेळी विधानसभा अध्यक्ष अपात्रतेच्या याचिका निकालात काढत असतात त्या वेळी त्यांनी इतर कोणतीही कामे करू नयेत, असा कोणताही आदेश नाही, असे नार्वेकर यांनी म्हटले आहे.

दरम्यान, आज गोव्यात एका कार्यक्रमासाठी जात असताना माझी विमानतळावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अनिल देसाई आणि राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांच्याशीही भेट झाली. मग ही भेटदेखील कोणत्या हेतूने झाली होती का, असा खोचक सवालही नार्वेकर यांनी उद्धव ठाकरेंना विचारला आहे.

# मनसेच्या दोन गटांमध्ये राडा

## ■ खारघरमध्ये कार्यकर्ते आणि जाधव समर्थक भिडले

**पनवेल : बातमीदार**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दोन गटांमध्ये मंगळवारी (दि.९) खारघर येथे जोरदार राडा झाला. या वेळी मनसे मराठी कामगार सेनेचे अध्यक्ष महेश जाधव समर्थक माथाडी कामगार आणि कार्यकर्ते आमनेसामने आले होते.

मनसे मराठी कामगार सेनेचे अध्यक्ष महेश जाधव यांनी त्यांच्याच पक्षावर गंभीर आरोप केले. राज ठाकरेंचा पक्ष खंडणीखोर आहे. कामगारांची बाजू घेणे मी सोडत नाही म्हणून मनसे नेते अमित ठाकरे यांनी मला राजगड येथे बोलवून बेदम मारहाण केल्याचे जाधव यांनी सोशल मीडियावरून व्हिडीओ शेअर करीत सांगितले. या वेळी जाधव हे रक्तबंबाळ झालेले दिसून आले.





महेश जाधव यांच्या आरोपांनंतर राडा झाला. जाधव समर्थक आणि मनसे कार्यकर्ते आमनेसामने आले. माथाडी कामगार हे जाधव यांच्या समर्थनार्थ खारघर येथील मेडीकेअर रुग्णालयाजवळ जमा झाले होते. त्याचवेळी मनसे कार्यकर्ते रुग्णालयात येत असताना दोन्ही गट भिडले. जाधवांच्या समर्थकांनी मनसेच्या कार्यकर्त्यांना पळवून पळवून मारल्याचे समोर आले आहे. दुसरीकडे जाधव हे कामोठे येथील कार्यालयात पत्रकार परिषद घेणार होते. तत्पूर्वीच मनसे कार्यकर्त्यांनी या कार्यालयाची तोडफोड केली.

यानंतर सायंकाळच्या सुमारास पुन्हा धुमश्चक्री झाली. या वेळी मनसे कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमले होते. तुलनेने जाधव समर्थक कमी होते. त्यामुळे मनसे कार्यकर्त्यांनी आधीच्या प्रकाराचा राग या वेळी व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. याची माहिती मिळताच पोलिसांनी बंदोबस्त वाढवला.

दरम्यान, मनसेकडून एक पत्रक जारी करून राज ठाकरे यांच्या आदेशानुसार मराठी कामगार सेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे, तर जाधव यांनी आपण राजीनामा दिला असल्याचे म्हटले आहे.

### आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी

मनसे मराठी कामगार सेनेचे अध्यक्ष महेश जाधव यांनी फेसबुक लाईव्ह करून मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि युवा नेते अमित ठाकरेंवर गंभीर आरोप केले. जाधव यांच्या या आरोपानंतर मनसेने खुलासा केला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून महेश जाधव यांच्याविरोधात कामगारांच्या अनेक तक्रारी पक्षाकडे येत होत्या. जाधवच याला जबाबदार आहेत, असा दावा मनसेकडून करण्यात आला आहे.

# रोह्यात मोठा शस्त्रसाठा जप्त

## तरुणाला अटक

**रोहा, धाटाव, अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने सोमवारी (दि. ८) रात्री रोहा शहरातील धनगरआळी येथून मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा जप्त केल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी तन्मय सतिश भोकटे (वय २४) याला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात आणखी काही लोकांना अटक होण्याची शक्यता आहे.

रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी मंगळवारी (दि. ९) पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे या वेळी उपस्थित होते.





रोहा शहरातील धनगरआळी येथील एका तरुणाकडे अग्निशस्त्रे असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक धनाजी साठे, हवालदार जितेंद्र चव्हाण, रूपेश निगडे, नाईक विशाल आवळे, शिपाई अक्षय सावंत, मोरेश्वर ओमले यांचे पथक तयार केले. या पथकाने सोमवारी रात्री १०च्या सुमारास धनगरआळी येथे जाऊन तन्मय भोकटे याच्या घराची झडती घेतली. या वेळी चार बाराबोर बंदूक, एक देशी बनावटीचे रिव्हॉल्वर, पाच धारदार चाकू, दोन धारदार तलवारी, सहा कोयते, **(पान २ वर..)**

**रोहा येथील शस्त्रसाठाप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. त्याला कोण मदत करीत होते. शस्त्र बनविण्यासाठी लागणारे साहित्य तो कोणाकडून आणत होता तसेच त्याच्याकडून कुणी शस्त्रे विकत घेतली आहेत का याचा तपास केला जाईल. त्यांच्यावरदेखील कारवाई केली जाईल. त्यामुळे या प्रकरणात आणखी काही लोकांना अटक होऊ शकते.**

**-सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड**

## निवडक

### मोदी सरकार लक्षद्वीपमध्ये बांधणार नवीन विमानतळ

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार आता लक्षद्वीपच्या मिनिकॉय बेटांवर नवीन विमानतळ बांधणार आहे. येथून लढाऊ, लष्करी आणि व्यावसायिक विमाने चालवता येतील अशी योजना आहे. त्यामुळे भारताची लष्करी ताकद वाढेल. याशिवाय नागरी विमानेही येथे ये-जा करू शकतील. सध्या लक्षद्वीपमध्ये आगती येथे एकच हवाई पट्टी आहे, परंतु तेथे सर्व प्रकारची विमाने उतरू शकत नाहीत.

### राष्ट्रपतींच्या हस्ते खेलरत्न पुरस्कारांचे खेळाडूंना वितरण

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती भवनात मंगळवारी (दि.९) झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते खेलरत्न पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये क्रिकेटपटू मोहम्मद शमीसह २६ जणांना अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याशिवाय चिराग शेट्टी व सात्विकसाईराज रँकीरेड्डी (बॅडमिंटन) यांना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले.



# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी जागतिक स्पर्धेत अव्वल

## वैष्णवी चव्हाणचे मान्यवरांकडून कौतुक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी वैष्णवी चव्हाण हिने पीएएमए ग्लोबल अबॅकस ॲण्ड मेंटल अरीथमेटिक कॉम्पिटिशनमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

जागतिक पातळीवरील या स्पर्धेत चीन, जपान, रशिया, तैवान आदी १६ देशांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये वैष्णवी चव्हाणने बाजी मारली.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वैष्णवीचे कौतुक करून अभिनंदन केले. या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, मुख्याध्यापिका राज अलोनी उपस्थित होते.

# आमदार रवींद्र वायकर यांच्या घरी ईडीचा छापा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील जोगेश्वरी येथील भूखंड घोटाळाप्रकरणी ठाकरे गटाचे आमदार रवींद्र वायकर यांच्या घरी ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयाने मंगळवारी (दि.९) छापा टाकला. आमदार वायकर यांच्या मातोश्री क्लब, निवासस्थान अशा एकूण चार ठिकाणी ईडीकडून छापेमारी करण्यात आली आहे.



जोगेश्वरी भूखंड घोटाळाप्रकरणी ईडीने आमदार रवींद्र वायकर यांना नोटीस धाडली होती. त्यानंतर मंगळवारी सकाळी ७ वाजल्यापासून छापेमारी सुरू झाली. ईडीच्या अधिकाऱ्यांकडून आमदार वायकर व कुटुंबीयांची चौकशी करण्यात आली तसेच काही कागदपत्रांची चाचपणी केल्याचे समजते.

# संगीत क्षेत्रातील तारा निखळला

## उस्ताद राशिद खान यांचे निधन

**कोलकाता : वृत्तसंस्था**

प्रख्यात संगीतकार, गायक उस्ताद राशिद खान यांचे मंगळवारी (दि.९) निधन झाले. ते ५५ वर्षांचे होते. मिळालेल्या माहितीनुसार त्यांना प्रोस्टेट कॅन्सरचे निदान झाले होते. त्यांच्यावर कोलकात्यातील एका रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं आणि मुलगी असा परिवार आहे.

मागील महिन्यात सेरेब्रल अटॅक आल्यानंतर उस्ताद राशिद खान यांची तब्येत अधिकच बिघडली. त्यांच्यावर सुरुवातीला टाटा मेमोरियल कॅन्सर रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यानंतर त्यांना कोलकात्यातील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना व्हेंटिलेटर आणि ऑक्सिजन सपोर्टवर ठेवण्यात आले होते, मात्र डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतरही त्यांना वाचवण्यात यश आले नाही.



उस्ताद राशिद खान उस्ताद रशिद खान यांच्यावर उस्ताद आमिर खाँ आणि पं. भीमसेन जोशी यांच्या गायकीचा प्रभाव होता. त्यांना २०२२मध्ये पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले होते. त्यांच्या निधनाबद्दल कला क्षेत्रात शोक व्यक्त होत आहे. त्यांच्यावर बुधवारी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

# पनवेल तक्का येथे विकासकामाचे भूमिपूजन

## ■ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक विकासकामे होत आहे. यालाच अनुसरून पनवेल महापालिकेच्या माध्यमातून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड'मधील प्रभाग क्रमांक २० येथील विकासकामाचे भूमिपूजन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि.८) करण्यात आले.

प्रभाग क्रमांक २०मधील तक्का मोराज सोसायटी ते राजस्थानी स्मशानभूमीपर्यंत फुटपाथवर स्टॅम्प कॉंक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामासाठी ११ लाख ३६ हजार २२७ रुपये मंजूर करण्यात आले आहे. या कामाच्या भूमिपूजन समारंभास भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे, संदीप बहिरा, प्रतिक बहिरा, अक्षय भगत, स्वरूप मुंबईकर, श्री. कपाळे, श्री. जगदाळे, बबन कांबळे, उमेश मोरे, हारून शेख, भारत बहिरा, जितू खुटकर, आफताब ताडे, संतोष आपशिंगेकर, हिरामण पाटील, दिलीप बहिरा, रोशन कोळी, अतुल बहिरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# हे मालदीव नाही, तर महाराष्ट्राला लाभलेले आपले सुंदर कोकण!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून कोकणचे सृष्टीसौंदर्य अधोरेखित

### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पनेला पाठिंबा

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारताचा केंद्रशासित प्रदेश लक्षद्वीपमध्ये पाऊल टाकताच या भागासह देशातील समुद्रकिनारी असलेले सृष्टीसौंदर्य अधोरेखित होऊ लागले आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोकणातील सिंधुदुर्गमधील काही फोटो सोशल मीडियातून शेअर करीत झळाळी दिली आहे.

उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी फोटो पोस्ट करीत म्हटले आहे की, हे मालदीव नाही! महाराष्ट्राला लाभलेले हे आपले सुंदर कोकण! फोटो सिंधुदुर्गातील आहेत. जेव्हा तुम्ही भारतीय बेटे एक्सप्लोअर करता, तेव्हा कोकणाला भेट देणे चुकवू नका आणि







छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्थापत्य पराक्रमाचे एक उत्तम उदाहरण पाहून मंत्रमुग्ध व्हा. सिंधुदुर्ग किल्ला ते भारतातील पहिले एकात्मिक स्कूबा डायव्हिंग स्कूल, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्कूबा डायव्हिंग ॲण्ड एक्वाटिक स्पोर्ट्स तारकर्ली येथे भव्य अरबी समुद्राचे चित्तथरारक दृश्य व बीच... या फोटोंना पसंती मिळत आहे.

# राज्यात १० लाख हेक्टरवर होणार बांबूची लागवड

## पहिल्या पर्यावरणीय शाश्वतता शिखर परिषदेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

वातावरण बदलाच्या आजच्या काळात कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी बांबू लागवड हा चांगला पर्याय आहे. येत्या काळात राज्यात १० हजार हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवड करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह येथे मंगळवारी (दि.१०) पहिल्या पर्यावरणीय शाश्वतता शिखर परिषदेचे मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास व्यासपीठावर कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पाटील, गोदरेज उद्योग समुहाचे नादिर गोदरेज, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव सचिव अनुप कुमार, वन विभागाचे सचिव वेणुगोपाल रेड्डी आदी उपस्थित होते.




मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, सध्या निसर्गचक्र बदलत असून अवकाळी, गारपीट, अतिवृष्टी अशा समस्यांचा सामना करावा लागत आहे. हे सर्व पर्यावरण बदलामुळे होत आहे. यावर पर्यावरणाचे संवर्धन हा एकमेव उपाय आहे. कार्बनचे उत्सर्जन कमी झाले करणे यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून बांबू लागवड उपक्रम हाती घेण्यात आला आहे. बांबूमध्ये पर्यावरण समतोल राखण्याची प्रचंड क्षमता आहे. एक बांबू ३२० किलो प्राणवायू निर्माण करते. कार्बनचे मोठ्या प्रमाणावर शोषण करतो. इतर वृक्षांच्या तुलनेत ३० टक्के जास्त कार्बन बांबू शोषतो. बांबू लागवडीतून शेतकऱ्यांनाही फायदा होतो. त्यांचा आर्थिकस्तर उंचावण्यासाठी मदत होते. ऊसापेक्षा बाबू लागवड जास्त फायदेशीर आहे. बांबूपासून विविध उत्पादने तयार केली जातात. त्यामुळे स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होत आहे.

### शासन शेतकऱ्यांच्या विकासासाठी कार्यरत

शासन शेतकऱ्यांच्या विकासासाठी काम करीत आहे. शेतकऱ्यांच्या आणि पर्यावरणाच्या फायद्याच्या अनेक योजना शासन राबवत आहे. जलयुक्त शिवार ही अशीच एक योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून भूजल पातळी वाढण्यास मदत होत आहे. राज्याच्या विकासाचे अनेक प्रकल्प शासन राबवत आहे. समृद्धी महामार्ग, कोस्टल रोड, ट्रान्स हार्बर सी लिंक असे प्रकल्प मार्गी लावण्यात आले. हे विकास प्रकल्प राबवताना पर्यावरणाची योग्य ती काळजी घेतल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

शहरी भागातील प्रदूषण कमी करण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून संपूर्ण स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानामुळे मुंबईतील प्रदूषणाचा निर्देशांक ३५०वरून ८० ते ११०पर्यंत कमी झाला आहे. शहरी भागातील प्रदूषण रोखण्यासाठी अर्बन फॉरेस्ट तयार करण्यात येत आहे. पश्चिम आणि पूर्व या दोन्ही द्रुतगती मार्गांच्या दोन्ही बाजूला बांबू लागवडीचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील महामार्गांच्या दुतर्फा बांबू लावण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. बांबू हा शेतकऱ्यांसाठी फायद्याचा आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी बांबू शेतीकडे वळावे. बांबू पिकाचा समावेश मनरेगामध्ये करण्यात आला आहे. बांबू लागवडीसाठी प्रती हेक्टरी सात लाखांचे अनुदान दिले जाते.

शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देणाऱ्या या पिकाकडे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी वळावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

## सराईत चोरांना पुण्यातून अटक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाणे हद्दीमध्ये तीन महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने दुचाकीवरून येऊन खेचून नेण्याची घटना घडली होती. मोक्कामधील आरोपी असलेल्या या सराईत गुन्हेगारांना पुणे देहूरोड येथून पकडून सोन्याचे दागिनेदेखील कर्जत पोलिसांनी हस्तगत केले आहेत. या दोन तरुणांवर विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

कर्जत पोलीस ठाण्यात १२ डिसेंबर २०२३रोजी सोन्याचे दागिने चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे आणि पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी पथक तयार केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले, हवालदार समीर भोईर, स्वप्नील येरुणकर यांचे पथकाने गोपनीय बातमीदाराकडून मिळालेली माहिती, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करून आरोपी महादेव उर्फ महाद्या गौतम थोरात (वय २१) व चेतन सुनील पाटील (वय २०, दोघेही रा. खडकी बाजार, पुणे) यांना देहूरोड परिसरातून अटक केली, तसेच आरोपींनी चोरलेले एक लाख ४५ हजार रुपये किमतीचे दागिने हस्तगत केले.

त्याचप्रमाणे तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन, लोणावळा पोलीस स्टेशनमधील पल्सर दुचाकी, तर तळेगांव दाभाडे पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथील दाखल गुन्ह्यातील चोरीस गेलेली दुचाकी हस्तगत केली आहे.

आरोपी महादेव उर्फ महाद्या गौतम थोरात याच्यावर सांगवी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड आयुक्तालयासह खडकी पोलीस ठाणे, स्वारगेट पोलीस ठाणे, बंडगार्डन पोलीस ठाणे आणि सांगवी पोलीस ठाण या ठिकाणी वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत.

## शासन आपल्या दारी कार्यक्रमात पनवेलमधील ट्रान्सजेंडरना ओळखपत्र



**पनवेल : प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी या कार्यक्रमांत पनवेलमधील ट्रान्सजेंडरना ओळखपत्र आणि सर्टिफिकेटचे वाटप करण्यात आले, तसेच अनैतिक व्यापारात गुंतलेल्या महिलांना पिवळे रेशन कार्डचे वाटप सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांचे हस्ते करण्यात आले

लोणेरे येथे शुक्रवारी झालेल्या शासन आपल्या दारी कार्यक्रमात पनवेल येथील आश्रय सोशल फाऊंडेशन या संस्थेतर्फे नोंदणी करण्यात आलेल्या ट्रान्सजेंडर मानसी राठोड, रिया राजबर व अंजली माने यांना ओळखपत्र आणि सर्टिफिकेटचे वाटप करण्यात आले, तसेच उषा पवार, राधिका केवट, पुष्पा गव्हाणे व रीना जिलेदार या महिलांना पिवळे रेशनकार्ड देण्यात आले.

आश्रय सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष अध्यक्ष अशोक गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली प्रकल्प व्यवस्थापक उर्मिला यादव, शिल्पा हळणकर, पर्यवेक्षिका संजीवनी सावंत, वराखी कचरे यांनी या लाभार्थींची कागदपत्रे पूर्ण करून नोंदणी केली होती.

## अवकाळी पावसाच्या भितीने वीटभट्टी व्यावसायिक धास्तावले



**चौक : प्रतिनिधी**

अवकाळी पावसाच्या शक्यतेने वीटभट्टीमालक धास्तावले असून काही ठिकाणी पावसाचा शिडकाव झाल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे.

राज्यात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. गेली काही वर्षे अवकाळी पावसाने वीटभट्टी मालकांचे मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे.

वीट बनविण्याचा व्यवसाय येथील स्थानिक करीत असले तरी विट तयार करणारे मजुर हे कर्नाटक राज्यातून आणले जातात. शिवाय तिथे जाऊन रक्कम आगाऊ देण्यात येते. गेले दोन दिवस उष्णता वाढली आहे. पावसाचे वातावरण निर्माण झाले असून बनलेली विट प्लास्टिक कागद टाकून झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जात आहे.

ज्यांची वीटभट्टी चेतवण्यात आली आहे, तेही अधिक घाबरले आहेत. त्यावर प्लास्टिक टाकून उपयोग नाही. या सर्व बाबींचा विचार करून शासनाने तातडीने मदत करण्याची मागणी होत आहे.

## माणगाव येथे घरातून चार लाखांचे दागिने घेऊन चोरटा फरार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथे फिर्यादींच्या घरातून चार लाखांचे सोन्याचे दागिने घेऊन अज्ञात चोरटा फरार झाला आहे. ही घटना १७ ते २७ डिसेंबर २०२३ दरम्यान घडली. या घटनेची फिर्याद पवन अर्जुन सोनावणे (वय ३८, रा. माणगाव) यांनी सोमवारी (दि. ८) माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

फिर्यादी पवन अर्जुन सोनावणे यांच्या घरातील लोखंडी कपाटाच्या लॉकरमधील एक लाख १२ हजार ४०० रुपये किमतीचे सोन्याचे गंथन, एक लाख १९ हजार ६०० रुपये किमतीच्या बांगड्यांचे जोड, ५८ हजार ८०० रुपये किमतीचा सोन्याचा हार, २० हजार ९२० रुपये किमतीचा सोन्याचा टॉप, ७२ हजार ८०० रुपये किमतीची चैन असे एकूण तीन लाख ८४ हजार ५२० रु. किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्या इसमाने चोरून नेले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक गायकवाड करीत आहेत.

## सिडको भवनात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सिडको बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशनतर्फे आयोजित सावित्रीबाई फुले जयंती सोहळा सिडको भवन येथे मंगळवारी (दि. ९) झाला. या कार्यक्रमाकरिता परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते रवींद्र पोखरकर यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून सावित्रीमाई फुलेंच्या कार्याचा आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले.



या वेळी सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर, महाव्यवस्थापक (कार्मिक) फैय्याज खान व कंपनी सचिव अमिता पौनीकर या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या. त्याचबरोबर सिडको एम्प्लॉईज युनियन अध्यक्ष विनोद पाटील, सरचिटणीस जे. टी. पाटील, सिडको बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन अध्यक्ष नरेंद्र हिरे व सरचिटणीस नितीन कांबळे यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.

अनिल डिग्गीकर यांनी, सावित्रीबाई फुले यांचे कार्य केवळ स्त्री शिक्षणापुरते मर्यादित नसून समाजसुधारणेसाठी त्यांनी दिलेले योगदानही तितकेच मोलाचे आहे, असे प्रतिपादन केले. सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त सिडको महामंडळातील व महामंडळाबाहेरील कर्तृत्वान महिलांना सावित्रीच्या लेकी या विशेष पुरस्काराने सन्मानित करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात येतो.

या वर्षीच्या सावित्रीच्या लेकी या पुरस्काराने माजी प्रभारी मुख्य लेखाधिकारी अस्मिता दळवी, नवी मुंबई प्रकल्पग्रस्त महिला वैमानिक अलिशा पटेल आणि कनिष्ठ अर्थशास्त्रज्ञ सिडको माधुरी माणिककुवर यांना सन्मानित करण्यात आले.

## माध्यमांवरील बंदीचा पत्रकार संघाकडून निषेध

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकशाही वृत्तवाहिनीवर केंद्राने पुन्हा एकदा ३० दिवसांची बंदी आणली आहे. अशा प्रकारे माध्यमांवर बंदी आणणे हे लोकशाहीला घातक असून मुंबई मराठी पत्रकार संघ या बंदीचा तीव्र शब्दांत निषेध करत आहे.

लोकशाही वृत्तवाहिनी मागे मुंबई मराठी पत्रकार संघ ठामपणे उभा आहे, असे मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यवाह संदीप चव्हाण यांनी सांगितले.



**धाटाव : भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष व माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांना रोठ बुद्रुक येथील निवासस्थानी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : जितेंद्र जाधव)

## राज्य शिक्षक परिषदेच्या कोकण विभागाची सभा

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील अशोकदादा साबळे विद्यालयात शिक्षक परिषद कोकण विभाग पदाधिकारी सभा रविवारी (दि. ७) राज्याध्यक्ष वेणूनाथ कडू यांच्या उपस्थितीत व कोकण विभाग अध्यक्ष गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षेखाली झाली. प्रारंभी दिवंगताना श्रद्धांजली वाहण्यात आली तसेच उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.



कोकण विभाग उपाध्यक्ष विजय भामरे यांनी प्रास्ताविक केल्यानंतर कोकण विभाग कार्यवाह लक्ष्मण वालगुडे यांनी विषय वाचन केले. विभाग कोषाध्यक्ष पी. एन. पाटील यांनी विभाग कोषाध्यक्ष अहवाल सभेपुढे मांडला. राज्याध्यक्ष वेणूनाथ कडू यांनी नागपूर येथे होणाऱ्या राज्य अधिवेशनाबाबत मार्गदर्शन केले तसेच जिल्हा पालक म्हणून पालघर वेणूनाथ कडू, ठाणे गुलाबराव पाटील, उल्हासनगर हेमलता मुनोत, रत्नागिरी विजय भामरे, नवी मुंबई पनवेल अनिल पाटील, रायगड लक्ष्मण वालगुडे यांची नियुक्ती जाहीर केली.

कोकण विभाग मार्गदर्शक इनामदार व कोकण विभाग उपाध्यक्षपदी हेमलता मुनोत यांची नियुक्ती जाहीर केली. कोकण विभाग अध्यक्ष यांनी संघटनावाढ व विस्तार, शिक्षण क्षेत्रातील समस्या निवारण प्रयत्नशील असावे. रत्नागिरी येथे आगामी कोकण विभाग दोन दिवशीय अभ्यास वर्ग आयोजित केला जाईल, असे सूचित केले. याशिवाय पीएफ स्लिप, राष्ट्रीयकृत बँकेतून पगार याविषयी चर्चा केली.

सभेस रायगड जिल्हाध्यक्ष विजय दरेकर, रत्नागिरी जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, पनवेल महानगर अध्यक्ष अनिल पाटील, रायगड कार्याध्यक्ष दिलीप उभारे, कार्यवाह रवी जाधव, कोषाध्यक्ष सचिन पाटील, सोमनाथ कराड, शिवनाथ दराडे, अंकुश शेंडगे, भरत काळे, पोलादपूर तालुकाध्यक्ष सुरेश साबळे, गणेश पाटील, कदम सर, मोटे सर, मनीषा भामरे, शुभांगी बने आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

### रोह्यात मोठा शस्त्रसाठा जप्त

९० जिवंत काडतुसे, पाच रिकामी काडतुसे, बंदूक व काडतुसे बनवण्याचे साहित्य, हरिण व इतर प्राण्यांच्या २२ शिंगांची जोडी आणि शस्त्रे बनविण्यासाठी लागणारे साहित्य आढळून आले. पोसिांनी हा सर्व शस्त्रसाठा जप्त करून तन्मयला अटक केली.

देशी बनावटीचे रिव्हॉल्वर विकत घेतले. बाकी इतर सर्व बंदुका, तलवारी, कोयते चाकू स्वतः बनविल्याचे तन्मय भोकटे याने पोलिसांना सांगितल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनथ घार्गे यांनी दिली.

या प्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम १९५९चे कलम ३,४,५(क), (ख),७(क),(ख),२५ वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२चे कलम २ (३१),४८,५१ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास उपनिरीक्षक धनाजी साठे व पथक करीत आहे.

## जय श्रीरामच्या गजराने चिरनेर गाव दुमदुमले..!

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

अयोध्यावरून आलेल्या पवित्र अक्षता कलश यात्रेचे चिरनेर गावात भक्तीमय वातावरणात आगमन झाले. चिरनेर गावात जय श्रीराम नामाचा जय घोष करीत, पवित्र मंत्रोच्चारांनी व टाळ-मृदुंगांच्या जयघोषात अक्षता कलशाचे स्वागत करण्यात आले.



अयोध्येत प्रभू श्री रामचंद्राच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारी २०२४ रोजी होत आहे. श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या भव्य वास्तूच्या गर्भगृहात अक्षतांचे पूजन व अभिमंत्रण करण्यात आले. त्यानिमित्ताने संपूर्ण देशात श्रीराम पूजा मंगल अक्षतः कलश दर्शनासाठी आणला जात आहे. मंगल अक्षता कलशातील अक्षतांचे वाटप १ ते १५ जानेवारीदरम्यान प्रत्येक घरोघरी करण्यात येणार आहे.

तीन वर्षांपूर्वी अयोध्या येथील प्रभू श्रीरामचंद्रांच्या मंदिरासाठी चिरनेर गावातून, ५५ हजार रुपयांची मदत लोकवर्गणीतून देण्यात आली होती.

या मिरवणुकीत प्रभू श्रीरामचंद्रांची प्रतिमा सोबत घेऊन, मुख्य पवित्र अक्षता कलशाबरोबर २२ महिलांनी कलश डोक्यावर घेऊन, श्रीराम नामाचा गजर करीत, पदयात्रा काढण्यात आली होती. स्त्रियांच्या डोक्यावरील अक्षता कलश पाहताना मन मोहरून गेले होते. मिरवणुकीतील टाळ मृदुंगांचा गजर यामुळे संपूर्ण गावातील वातावरण राममय झाले होते.

'जय श्रीराम'चा जयघोष अशा आनंद आणि उत्साहपूर्ण राममय वातावरणात अयोध्येतील रामलल्लांची मूर्ती असलेल्या मंदिराच्या गर्भगृहात पूजन करून आणलेल्या अक्षतांचे पूजन करीत चिरनेर गावात भव्य मंगल कलश यात्रा काढण्यात आली.

या वेळी मोठ्या संख्येने वारकरी, नागरिक, महिलावर्ग व अबाल वृद्ध यात्रेत सहभागी झाले होते. या वेळी प्रत्येक मंदिराच्या ठिकठिकाणी आणि घराघरातून या मिरवणुकीचे भव्य स्वागत करण्यात आले. यानिमित्ताने चिरनेर मधलापाडा येथील श्रीराम मंदिरातून, श्री रामाच्या प्रतिमेचे पूजन करून, ही मिरवणूक काढण्यात आली होती.

चिरनेर गावातील सात पाड्यात हा पवित्र मंगल अक्षता कलश फिरविण्यात आला. तदनंतर पुन्हा श्रीराम मंदिरात आरती घेऊन, अक्षता मंगल कलश यात्रेचा सांगता समारोप करण्यात आला.

## निवडक

### पनवेलच्या योग केंद्राला पुरस्कार

**पनवेल :** इन्स्टिट्यूट ऑफ योग आणि आयुर्वेद आणि आरोग्य सेवा समिती, पनवेल यांच्या वतीने गेली ३४वर्षे अव्याहतपणे सुरु असलेल्या योग केंद्राला सदाशिव निंबाळकर 'योग मित्र' हा पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा, रविवारी (दि. १४) सकाळी ८ वाजता योग भवन (प्लॉट नं. १४, सेक्टर ९ए, योग विद्या निकेतन चौक, वाशी, नवी मुंबई) येथे आयोजित करण्यात आला आहे.

### श्री वेणाभारती महाराजांची प्रवचनमाला

**पनवेल :** कपिकुल सिद्धपीठम आश्रम, नाशिक येथील पनवेल कपिकुल केंद्राच्या ५व्या वर्धापनदिनानिमित्त सद्गुरु श्री वेणाभारती महाराज यांच्या अमृत वाणीतील तीन दिवसीय प्रवचनमाला व पनवेलच्या विविध भागात भिक्षा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कपिकुल सिद्धपीठम पंचवटी पिठाधिश्वरी १००८ श्रीमहंत तपोमुर्ती सद्गुरु श्रीवेणाभारती महाराज यांचा अमृत सत्संग कार्यक्रम होणार आहे. यामध्ये भगवान शंकरांनी स्वमुखे गायिलेल्या गुरुगीतेचे महत्त्व या विषयावर महाराज प्रवचन करतील. १२, १३ व १४ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ५.३० ते ८.३० वाजता शहरातील श्रीविरुपाक्ष महादेव मंदिर येथे कार्यक्रम होणार आहे.

### कर्मचाऱ्यांतर्फे स्वच्छता मोहीम



**रसायनी :** पाताळगंगा एमआयडीसीमधील सिप्ला कंपनीच्या १४८ कर्मचाऱ्यांनी शनिवारी (दि. ६) कंपनीच्या बाहेरील एमआयडीसीच्या रस्त्यांवर स्वच्छता करून सिपला कंपनीच्या सिपला फॉर चेंज या उपक्रमांतर्गत सामाजिक कार्य केले. या उपक्रमाबद्दल बोलताना सिप्ला कंपनीचे साईट एचआर हेड विनायक काळे म्हणाले की, महात्मा गांधी यांच्या मनातील स्वच्छ भारत ही संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत – एक कदम स्वच्छता की ओर या संकल्पनेतून गावागावांमध्ये रुजवली. त्याचाच धागा पकडून सिप्लाच्या कर्मचाऱ्यांनी स्वच्छते बद्दल जागरूक असावे म्हणून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. या वेळी कंपनीचे अधिकारी उदय वाघ, श्रीकांत मुदगल, नेहा पाल, संतोष बारी आदी उपस्थित होते.

### खारघरमध्ये धावत्या गाडीला आग

**पनवेल :** चालत्या कारने पेट घेतल्याची घटना खारघरमध्ये घडली असून यामध्ये कारचा समोरील भाग जळून खाक झाला. या वेळी अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. खारघरमध्ये राहणारे अनिल कुलकर्णी हे सकाळच्या सुमारास आपल्या कारने सेंट्रल पार्ककडून उत्सव चौकाकडे जात होते. प्रणाम हॉटेलजवळ त्यांच्या धावत्या कारमधून धूर येऊ लागल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या वेळी कुलकर्णी तत्काळ चारचाकीमधून बाहेर पडले. या आगीत कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

# पंतप्रधानांच्या आगमनाची जोरदार तयारी

**उरण : प्रतिनिधी**

शिवडी–न्हावा सागरी सेतूच्या उद्घाटनासाठी येणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी सरकारी यंत्रणा आगमनापुर्वीच कामाला लागली आहे. या परिसरातील रस्ते चकाचक दिसण्यासाठी शेकडो कर्मचारी साफसफाईच्या कामाला जुंपल्याचे दिसून येत आहे.



देशातील सर्वांत मोठ्या लांबीच्या शिवडी–न्हावा सेतूचे उद्घाटन १२ जानेवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. त्यानिमित्ताने उलवे येथील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जागेत उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगमनापुर्वी सर्वच शासकीय यंत्रणेच्या कामांना वेग आलेला आहे.

नवी मुंबई बेलापूर किल्ल्यापासून उलवा–गव्हाण दरम्यानचे दुतर्फा रस्ते स्वच्छ करण्यासाठी पनवेल, नवी मुंबई महापालिका आणि सिडकोचे शेकडो सफाई कर्मचारी कामात गुंतले आहेत. दोन्ही रस्त्यांच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकामधील सुशोभीकरणासाठी लावण्यात आलेल्या फुलझाडांना पाणी दिले जात आहे. झाडांच्या बुंध्याशी असलेले गवत, कचरा, घाण साफ केली जात असल्याचे दृश्य दिसत आहे. रस्त्यांच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकांची साफसफाई करून रंगरंगोटी करण्यात येत आहे.

पंतप्रधानांच्या आगमनापुर्वीच स्वागतासाठी विविध शासकीय विभागांकडून सुरू असलेल्या या दुरुस्ती व साफसफाईच्या कामांमुळे प्रवासी, वाटसरूंकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींचे उज्ज्वल यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पोदार इंटरनॅशनल स्कूल, नेरूळ येथे आयोजित केलेल्या नोबेल पारितोषिकासाठी प्रतिभेचे पोषण–२०२३ या आंतरशालेय स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरच्या दोन विद्यार्थिनींनी रँक मिळवला.

इयत्ता बारावी क मधील मुक्ती मायशेरी हिने जीवशास्त्रासाठी प्रथम क्रमांक मिळवला. इयत्ता अकरावी 'अ'मधील देवयानी लांडगे हिने भौतिकशास्त्रात द्रितीय क्रमांक मिळवला. या विद्यार्थिनीचे रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, जनार्दन भगत संस्थेचे चेअरमन माजी खासदार रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले.





**पनवेल : दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याबद्दल त्यांना ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी व दै. सकाळचे गणेश दाते यांनी मंगळवारी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.**
(छाया : विकास म्हात्रे)

## उलवेमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या आवारात वृक्षारोपण

### भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हॉइस चेअरमन वाय. टी. देशमुख यांचा वाढदिवस सोमवारी (दि. ८) विविध उपक्रम राबवून साजरा झाला. वाढदिवसानिमित्त उलवेमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या आवारात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.





(छाया : योगेश पाटील)

या वेळी उपस्थितांनी वाय. टी. देशमुख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी कामगार नेते सुरेश पाटील, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, माजी सरपंच भाऊशेठ पाटील, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, न्हावे ग्रामपंचायतीचे सदस्य सागर ठाकूर, माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, सुधीर ठाकूर, सी.एल. ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक संजय भगत, सचिव एस.टी. गडदे, कमलाकर देशमुख, जयवंत देशमुख, खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य एस.के. पाटील, रोहिदास ठाकूर, मल्हार नेटवर्कचे संचालक दर्शन ठाकूर, किशोर पाटील, रवींद्र भोईर, शिवसेनेचे मनोज घरत, गौरव कांडपिळे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## गव्हाण विद्यालयात प्रश्नमंजुषेच्या विजेत्यांना पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये भारत नामांकन संस्था अर्थात ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड यांच्या वतीने घेण्यात आलेल्या प्रश्न मंजुषा स्पर्धेतील विजेत्यांना बी.आय.एस.च्या वतीने रोख रकमेची पारितोषिके प्रदान करण्यात येवून विजेत्यांचा सन्मान करण्यात आला.

विद्यालयाच्या 'स्टँडर्डस् क्लब' अंतर्गत बी.आय.एस.च्या वतीने ह्या स्पर्धा घेण्यात आल्या.

विजेत्या स्पर्धकांना उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, प्रसिद्धी प्रमुख सागर रंधवे तसेच स्टँडर्ड क्लबच्या प्रमुख योगिता पाटील, बी.आय.एस.च्या प्रतिनिधी श्रावणी सावंत व आदित्य शिंदे आदींच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

या प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, 'रयत'चे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, सागर रंधवे, स्टँडर्डस् क्लबच्या मेंटॉर योगिता पाटील, शितलकुमार म्हात्रे तसेच चारूशीला ठाकूर व विद्यार्थी स्पर्धक उपस्थित होते.

प्रथम क्रमांक दीशा वर्तक (एक हजार रुपये रोख), द्रितीय क्रमांक तनया म्हात्रे (७५०रुपये), तृतीय क्रमांक आर्या पाटील, समृद्धी सुर्वे, अक्षरा पाटील (प्रत्येकी ५०० रुपये), उत्तेजनार्थ भार्गवी तेली (२५० रुपये) या प्रश्नमंजुषा स्पर्धेसाठी बी.आय.एस अर्थात ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डच्या वतीने पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.



## रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये स्टॉक मार्केटिंग विषयावर सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. ९) सकाळी ११ वाजता वाणिज्य शाखेतर्फे स्टॉक मार्केटिंग विषयावर सत्राचे आयोजन केले होते.



या सत्रसाठी प्रमुख वक्त्या म्हणून मरीना जोस यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील वाणिज्य, अकाउंट व फायनान्स, व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग शाखेतील तृतीय वर्षाच्या सुमारे ७५ विद्यार्थी व विद्यार्थिनींना स्टॉक मार्केटिंग, रियल इस्टेट, तसेच इन्व्हेस्टमेंट बद्दल असणाऱ्या मूलभूत गोष्टींविषयी त्यामध्ये प्रामुख्याने कंपनीचे शेअर्स, सेबी, कमर्शियल प्रॉपर्टी, इंडेक्स कशा पद्धतीने बदलते, स्टॉक एक्सचेंज याविषयी सविस्तर चर्चा करून विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून व मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या सत्राचे आयोजन केल्याबद्दल वाणिज्य विभागातील सर्व सदस्यांचे व महाविद्यालयात वाणिज्य शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनीचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या सत्राचे आयोजन प्रा. विशाल देशमुख विभाग प्रमुख वाणिज्य विभाग यांनी केले तसेच प्रा. नम्रता पारीक, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. शिल्पा पाटील, प्रा. मनोज यादव, प्रा. प्रमोद वाघे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## सिंधुदुर्ग जिल्हा रहिवाशांचे स्नेहसंमेलन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिंधुदूर्ग जिल्हा रहिवाशी हितवर्धक संघ पनवेल रायगड या संस्थेचे ३७ वे कौटुंबिक स्नेहसंमेलन रविवारी (दि. ७) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झाले.



संमेलनाध्यक्ष मंगेश परुळेकर, डॉ. भगवान बिरमुळे, संस्था अध्यक्ष केशव राणे, उपाध्यक्ष संतोष चव्हाण, प्रिया खोबरेकर, संस्थापक रामकृष्ण परब उपस्थित होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. जीवन गौरव पुरस्कार दत्ताराम राणे, शिल्पा गावडे, संध्या मिराशी, विद्या इंदप, वसंत सावंत तर मरनोत्तर जीवन पुरस्कारांमध्ये कै. शिवराम चव्हाण, बळीराम गावकर, संभाजी साईल यांच्या नातेवाईकांना देण्यात आले.

सिंधुरत्न पुरस्कारांमध्ये निलेश परब, प्रल्हाद साटम, संपदा मोरे, यांना गौरविण्यात आले. तर विशेष पुरस्कारांमध्ये वैशाली आणि बाबाजी नेरूरकर, अर्चना आणि अशोक चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार लेखक दिलीप रेडकर, सतिश शेट्टी, सुरेंद्र नेमलेकर यांना गौरविण्यात आले. त्यांनंतर मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करीत संघाला शुभेच्छा दिल्या व भावी वाटचालीसाठी योग्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर उद्योग डायरी २०२४ चे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर सिंधुदूर्ग सांस्कृतिक कला अकॅडमी निर्मीत ओमकार प्रस्तुत प्रसन्न कुमार घागरे व त्यांचा विद्यार्थिनींनी गीत संगि ताचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला.

संघातील स्त्री–पुरुष सदस्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी मराळ आणि श्रीनिवास काजरेकर यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केले.

## २२ जानेवारीला मांसाहार, दारूविक्री बंदीची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

२२ जानेवारी २०२४ हा दिवस खूपच महत्त्वाचा असून, ऐतिहासिक आहे. सर्वांसाठी सुवर्ण अक्षरांनी नोंद करण्यात यावा असा दिवस आहे. यादिवशी अयोद्धेमध्ये प्रभु श्रीरामचंद्रांच्या मुर्तीची पुन्हा प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. या सुवर्ण क्षणाचे आपण सर्वजण साक्षीदार होणार आहोत. त्यामुळे २२ जानेवारी २०२४ यादिवशी रसायनीत मांसाहार व दारूविक्री बंद करण्यात यावी, अशी रसायनी प्रखंडातील विश्वहिंदू परिषद बजरंग दलाने केली आहे.

असुरी प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी हे आवश्यक आहे. स्वहित, देश हितासाठी खूपच महत्त्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तो एक दिवस उपवास करण्याचा संकल्प केला आहे. आपण भारतीयांनीसुद्धा एक संकल्प केला पाहिजे. तो म्हणजे हा एक दिवस तरी पूर्ण सात्त्विक आहार घेऊन आपली सेवा श्रीरामाचे चरणी अर्पण करावी. आपल्या परिसरातील मंदिर, सार्वजानिक हॉल अशा ठिकाणी २२ जानेवारीला दुपारी भजन, किर्तन, प्रवचन, कथाकथनाद्वारे उत्सव साजरा करावा. हा राष्ट्रीय उत्सव झाला पाहिजे असे प्रयत्न सर्वांनी करावेत, असे आवाहन रसायनीतील विश्वहिंदू बजरंग दलाकडून करण्यात आले आहे.

## तळोजात दोन मृतदेह आढळले

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दोन अनोळखी व्यक्तींचा मृतदेह आढळून आला असून त्यांच्या नातेवाईकांचा शोध पोलीस करीत आहेत.

तळोजा फेज १ गार्डन जवळ ठिकाणी वय वर्षे ३५ ते ४० असून कुठल्यातरी शारीरिक आजाराने पुरुष बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. त्यानुसार बेवारस व्यक्तीला पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथे वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले आहे. काळा सावळा रंग व अंगावर कपडे नाहीत, साडेपाच फूट, केस बारीक काळे, अंगाने सडपातळ असा अनोळखी व्यक्ती आहे.

तळोजा मजकूर येथे ६० ते ६५ वर्षे वयोगटातील पुरुष व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळून आलेला त्यास उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले. या व्यक्तीची उंची साडेपाच फूट आहे, केस पांढरे, नाक सरळ व चेहरा लांबट व रंग काळा सावळा, अंगात ग्रे कलरचा मळकटलेला लांबट शर्ट, काळ्या रंगाचा बरमुडा, दाढी वाढलेली आहे, अनोळखी व्यक्ती आहे.

दोघेही व्यक्ती बेवारस असून त्यांची फोटो, माहिती तळोजा पोलीस ठाणे येथे उपलब्ध आहे. कुणाचे जवळचे व्यक्ती गायब असेल तर त्यांनी तळोजा पोलीस ठाणे येथे (०२२–२७४१२३३३) संपर्क साधण्याचे आवाहन तळोजा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बी.जी. खाटपे यांनी केले आहे.

## संपादकीय

# मस्तवाल मालदीव

गेल्या नोव्हेंबरात सत्तापालट झाल्यानंतर मालदीवच्या नव्या सत्ताधाऱ्यांनी भारतद्वेषाचा डंका पिटत चीनची तळी उचलून धरण्याचे धोरण अवलंबिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरूद्ध गरळ ओकण्याचा प्रकार हा मालदीवच्या चीनमैत्रीचाच भाग असल्याचे दिसते. अर्थात अशाप्रकारच्या उथळ कारस्थानांमुळे भारताचे काहीच बिघडणार नाही. उलटपक्षी याचे परिणाम मालदीवलाच भोगावे लागतील.

**भारताने मालदीवला वेळोवेळी भरपूर मदत केली आहे. हिंदी महासागरातील मालदीव हे बेट आकाराने छोटेसे असले तरी सामरिकदृष्ट्या या भूभागाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. श्रीलंका, मॉरिशस अशा अनेक बेटांवरील देशांसारखाच मालदीव हा देखील भारताचा जवळचा देश. येथील संस्कृतीदेखील हिंदी समाजाशी नाते राखून आहे. मालदीवमधील व्यापार बव्हंशी भारतीयांच्याच ताब्यात आहे. भारतापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या मालदीवचे अर्थकारण पर्यटन व्यवसायावर चालते. दर्जेदार आदरातिथ्य व सेवासुविधा ही पर्यटन व्यवसायाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. मालदीवमध्ये हे सारे गुण आहेत. मालदीवला भेट देणाऱ्या पर्यटकांमध्ये भारतीयांचा वाटा मोठा, जवळपास पंधरा-वीस टक्क्यांचा आहे. थोडक्यात भारताने या बेटावरील मायेची पाखर हटवली तर तेथील जनतेला जगणेच अशक्य होईल. तरीही त्याची तमा न बाळगता, मालदीवमधील सत्ताधाऱ्यांनी भारतद्वेषाची आग भडकवण्यास सुरूवात केली. गेल्या नोव्हेंबरपर्यंत मालदीवमध्ये डेमॉक्रेटिक पक्षाच्या इब्राहिम सोहिल यांची राजवट होती. त्यांना पराभूत करून पीपल्स नॅशनल काँग्रेसचे मोहम्मद मुइझ्झू सत्तेवर आले. मुइझ्झू यांना मालदीवच्या प्रोग्रेसिव्ह पार्टीची साथ मिळाली. या प्रोग्रेसिव्ह पार्टीचे अब्दुल यमीन हे कट्टर भारतविरोधी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या संगनमताने मुइझ्झू यांनी सार्वभौमत्वाची भाषा करत 'इंडिया आऊट' या घोषणेचा डंका पिटला होता. भारतविरोधाचे विष मुइझ्झू आणि त्यांच्या सहकारी मंत्र्यांच्या नसानसांत भिनले आहे. त्याचे प्रत्यंतर नुकतेच आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात मालदीवच्या तीन मंत्र्यांनी समाजमाध्यमांवरून जी गरळ ओकली, ती संतापजनक आहेच, परंतु ती तितकीच आत्मघातकीही आहे. लक्षद्वीप भेटीनंतर पंतप्रधान मोदी यांनी लक्षद्वीपच्या सौंदर्याचे खूप कौतुक केले होते. त्याविरोधात मुइझ्झू यांच्या मंत्रिमंडळातील मरियम शिऊना, मलाशा शरीफ आणि अब्दुल्ला माजिद यांनी अत्यंत आक्षेपार्ह टिप्पणी केली. त्यांची विधाने लोकशाही संकेतांना धुडकावून लावणारी तर होतीच, पण मूलभूत राजशिष्टाचाराचा विचारही बहुदा त्यांनी केला नव्हता. वास्तविक मोदी यांनी कुठलेच गैरविधान केले नव्हते. अन्य देशांना जसे सार्वभौमत्व आहे तसेच भारतीयांनादेखील आहे. पर्यटनाच्या शोधात परदेश गाठणाऱ्या भारतीयांना आपल्याच लक्षद्वीपमधील निसर्गसौंदर्याकडे आकृष्ट करावे एवढाच माफक हेतू पंतप्रधान मोदी यांचा होता. परंतु मोदी यांनी लक्षद्वीपचे कौतुक केल्यामुळे मालदीवच्या अंगाची लाहीलाही झाली. तेथील तीन मंत्र्यांच्या मस्तवाल टिप्पणीनंतर भारताने कठोर भूमिका घेतल्यानंतर मात्र मालदीवमधील सत्ताधीशांचे डोके ताळ्यावर आले असावे. त्यांनी ताबडतोब तिन्ही मंत्र्यांना निलंबित केले. आणि त्यांची विधाने ही सरकारी भूमिका नाही अशी सारवासारव केली. तथापि या घटनेने मालदीवमधील सत्तांतरानंतर उभय देशांतील ताणलेल्या संबंधांना आणखीनच ताणले हे मात्र खरे. भारतासारख्या सांस्कृतिक नाळ जुळलेल्या मोठ्या भावाशी चांगले संबंध राखणे यातच मालदीवचे हित आहे. चीनशी मैत्री केल्यामुळे श्रीलंका आणि पाकिस्तान या शेजाऱ्यांची कशी वाताहत झाली हे साऱ्या जगाने पाहिले आहे. पुढच्यास ठेच आणि मागचा शहाणा ही म्हण मालदीवने शिकून घ्यायला हवी.**

# आज जागतिक हिंदी दिन

१० जानेवारी हा दिवस जगभरातील हिंदी साधकांसाठी खूप खास दिवस आहे. कारण या दिवशी 'जागतिक हिंदी दिन' साजरा केला जातो. जगभरात हिंदी भाषेचा प्रचार-प्रसार करणे हे या दिवसामागचे महत्त्वाचे उद्दीष्ट आहे.

जगात हिंदीला चालना देण्यासाठी आणि हिंदी भाषेसंदर्भात जागरूकता निर्माण करण्यासाठी व हिंदीला आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून ओळख निर्माण करू देण्यासाठी दरवर्षी १० जानेवारी या दिवशी जागतिक हिंदी दिवस साजरा केला जातो. परदेशातील भारतीय राजदूत हा दिवस विशेषरित्या साजरा करतात. या दिवशी सर्व सरकारी कार्यालयांमध्ये विविध विषयांवर हिंदीमधील व्याख्याने आयोजित केली जातात. जगात हिंदीचा विकास व प्रसार व्हावा म्हणून जागतिक हिंदी परिषदेची सुरुवात झाली. नागपूर येथे १० जानेवारी १९७५ रोजी प्रथम जागतिक हिंदी परिषद झाली, म्हणून हा दिवस 'जागतिक हिंदी दिन' म्हणून साजरा केला जातो.

तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी १० जानेवारीला जागतिक हिंदी दिन म्हणून साजरे करण्याची घोषणा केली. तेव्हापासून या दिवशी जागतिक हिंदी दिन साजरा केला जातो. हिंदी दिन आणि जागतिक हिंदी दिन यांच्यात फरक आहे. देशात १४ सप्टेंबर रोजी 'हिंदी दिन' साजरा केला जातो. त्याचबरोबर १० जानेवारी रोजी 'जागतिक हिंदी दिन' साजरा केला जातो.




जगभरात हिंदीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी नागपुरात पहिली जागतिक हिंदी परिषद आयोजित करण्यात आली होती. म्हणून हा दिवस जागतिक हिंदी दिन म्हणून साजरा केला जातो. या परिषदेत ३० देशांतील १२२ प्रतिनिधी उपस्थित होते. २००६ सालापासून दरवर्षी १० जानेवारी रोजी जागतिक हिंदी दिन साजरा केला जातो. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी १० जानेवारी २००६ रोजी दरवर्षी जागतिक हिंदी दिन साजरा करण्याची घोषणा केली. जागतिक हिंदी दिनानिमित्त परदेशातील भारतीय दूतावासाद्वारे विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात. या दिवशी सर्व सरकारी कार्यालयांमध्ये विविध विषयांवर हिंदीमध्ये कार्यक्रम आयोजित केले जातात. भारतीय दूतावासाने नॉर्वे येथे पहिला जागतिक हिंदी दिन साजरा केला. यानंतर, भारतीय नॉर्वे माहिती व सांस्कृतिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने लेखक सुरेशचंद्र शुक्ला यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा आणि तिसरा जागतिक हिंदी दिवस मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला.

'जागतिक हिंदी दिन' वगळता दरवर्षी १४ सप्टेंबरला हिंदी दिवस साजरा केला जातो. १४ सप्टेंबर १९४९ रोजी संविधान सभेने हिंदीला राजभाषेचा दर्जा दिला, तेव्हापासून १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिन साजरा केला जातो. जगातील शेकडो विद्यापीठांमध्ये हिंदी भाषा शिकविली जाते. जगभरात कोट्यावधी लोक हिंदी बोलतात. एवढेचं नव्हे तर हिंदी ही जगभरात सर्वाधिक बोली जाणारी भाषा आहे.

दक्षिण प्रशांत महासागरातील मेलानेशियामध्ये फिजी नावाचे एक बेट आहे. फिजीमध्ये हिंदीला अधिकृत भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. त्याला फिजीयन हिंदी किंवा फिजीयन हिंदुस्तानी असेही म्हणतात. ही भाषा भोजपुरी आणि अन्य बोलीभाषांचा संमिश्र प्रकार आहे.पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, यूएसए, यूके, जर्मनी, न्यूझीलंड, युएई, युगांडा, गयाना, सुरिनाम, त्रिनिदाद, मॉरिशस आणि दक्षिण आफ्रिका यासह अनेक देशांमध्ये हिंदी बोलली जाते. २०१७ मध्ये ऑक्सफोर्ड शब्दकोषात प्रथमच 'अच्छा', 'बड़ा दिन', 'बच्चा' आणि 'सूर्य नमस्कार या हिंदी शब्दांचा समावेश केला गेला. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या गणनेनुसार, हिंदी ही जगातील दहा शक्तिशाली भाषांपैकी एक आहे.

हिंदी ही एक इंडो-आर्यन भाषा आहे. जी जगभरातील २६० दशलक्षाहून अधिक लोक बोलतात. ही जगातील चौथी सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. ही भारत सरकारची अधिकृत भाषा आहे आणि इंग्रजीसह भारताच्या दोन अधिकृत भाषांपैकी एक आहे.

१९७५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पहिल्या जागतिक हिंदी परिषदेचे उद्घाटन केले. तेव्हापासून भारत, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, युनायटेड किंगडम, मॉरिशस, त्रिनिदाद आणि टोबॅगोसह विविध देशांमध्ये जागतिक हिंदी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

हिंदी भाषेच्या संवर्धनाच्या उद्देशाने दरवर्षी १४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय हिंदी दिनाचे आयोजन केले जाते. अनेकदा लोकांमध्ये या दोन दिवसांबद्दल संभ्रम असतो. राष्ट्रीय हिंदी दिवस १४ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो तर १० जानेवारी रोजी जागतिक हिंदी दिन आयोजित केला जातो. जागतिक हिंदी दिन भाषेच्या जागतिक संवर्धनावर लक्ष केंद्रित करतो, तर हिंदी दिवस विशेषत: भारतात हिंदीला मान्यता देण्यावर लक्ष केंद्रित करतो.

स्वातंत्र्यानंतर विविधतेने भरलेल्या देशाला एकत्र आणण्यासाठी एक भाषा निवडणे अवघड होते. देशात अनेक भाषा आणि बोली होत्या, त्यामुळे अनेक विचारांनंतर नवीन राष्ट्राच्या भाषा म्हणून हिंदी आणि इंग्रजीची निवड करण्यात आली.

**(साभार : इंटरनेट)**

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभासाठी आवश्यक बाबी

पी.एम.किसान योजनेचा १६वा हप्त्याचा लाभ जानेवारी महिन्यात वितरीत करण्याचे केंद्र शासनाचे नियोजन आहे. योजनेसाठी नोंदणी करणे, ई-केवायसी करणे, बँक खाती आधार क्रमांकास जोडणे या बाबींची पूर्तता योजनेचा १६वा हप्ता वितरणापूर्वी शेतकऱ्यांनी स्वत: करावयाची आहे. यास्तव पी.एम. किसान योजनेच्या निकषांच्या अधिन राहून योजनेच्या लाभासाठी राज्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आवश्यक बाबींची पूर्तता घ्यावी, असे आवाहन कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय पुणे दिलीप झेंडे यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) २००० रुपये प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी ६००० रुपये लाभ अदा करण्यात येत आहे. लागवडीलायक क्षेत्रधारक, बँक खाती आधार संलग्न व योजनेचे eKYC केलेले शेतकरी कुटुंब पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत.

राज्याच्या भूमी अभिलेख नोंदीनुसार जमिनीचा तपशील अद्ययावत न केलेल्या, बँक खाती आधार संलग्न व ई-केवायसी न केलेल्या शेतकऱ्यांचा योजनेच्या लाभासाठी समावेश करण्यास अद्यापही वाव असल्याने केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ६ डिसेंबर, २०२३ ते १५ जानेवारी, २०२४ या कालावधीत गावपातळीवर ४५ दिवसांची विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने डॉ.वीण गेडाम आयुक्त कृषी यांनी महसूल, ग्रामविकास व कृषी या विभागांनी सर्व समन्वयाने राज्यातील पात्र शेतकऱ्यांना पी.एम.किसान योजनेत समाविष्ट करण्यासाठी या विशेष मोहिमेची यशस्वी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेमध्ये लाभार्थींची स्वयं नोंदणी व eKYCसाठी राज्यातील सर्व सामाईक सुविधा केंद्र (CSC) तर आधार संलग्न बँक खाती उघडण्यासाठी इंडिया पोस्ट पेमेंट बँक यांनाही सहभागी करण्यात आले आहे.

पी.एम.किसान योजनेच्या लाभासाठी बंधनकारक केलेल्या बाबींची पूर्तता केलेल्या लाभार्थींनाच योजनेचा लाभ केंद्र शासन अदा करत आहे. त्यामुळे भूमी अभिलेख नोंदीनुसार जमिनीचा तपशील अद्ययावत न केलेल्या, बँक खाती आधार संलग्न व ई-केवायसी न लाभार्थींनी सदर बाबींची पूर्तता करून घ्यावी. यामध्ये भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत नसलेल्या लाभार्थींनी संबंधित तलाठी/तहसील कार्यालयामध्ये संपर्क साधावा. eKYC व बँक खाती आधार संलग्न करणे यासाठी अनुक्रमे नजीकच्या सामाईक सुविधा केंद्र व इंडिया पोस्ट पेमेंट बँक च्या मार्फत कार्य पूर्तता करावी. अधिक माहितीसाठी नजिकचे कृषी सहाय्यक/कृषी पर्यवेक्षक/मंडळ कृषी अधिकारी/तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा. **-रायगड, जिमाका**



## बदलते तंत्रज्ञान

### मोबाईलमध्ये इंटरनेट झालंय स्लो? या टिप्स करा फॉलो

तुमचा मोबाईल स्लो होतो किंवा कधी हँग होतो. ही सर्व मोबाईल फोनची सामान्य समस्या आहे. नवा मोबाईल फोनवर घेतल्यावर सुरुवातीला हा फोन नीट चालत असतो नंतर काही काळानंतर या फोनचा इंटरनेटदेखील स्लो होतो. जर तुमचा ही मोबाईल स्लो चालत असेल तर मोबाईलचा स्पीड कसा वाढवायचा ते जाणून घ्या...

**नेटवर्क सेटिंग** : सर्व प्रथम तुमच्या फोनमध्ये योग्य नेटवर्क ऑपरेटरचे सिम कार्ड खात्री करा. तुमचा फोन ४G ला सपोर्ट करत असल्यास, तुम्ही ४G नेटवर्कवर आहात हे तपासा.

**डेटा ऑटो-अपडेट** : तुमच्या फोनमध्ये ऑटो डेटा-अपडेट चालू असल्यास, तुमच्या इंटरनेट स्पीडवर परिणाम होऊ शकतो. तुमच्या फोनच्या सेटिंग्जवर जा आणि डेटा ऑटो-अपडेट बंद करा.

**बिना कामाचे ॲप्स** : जर तुमच्या फोनमध्ये अनेक बॅकग्राउंड ॲप्स चालू असतील, तर तुमचा इंटरनेट स्पीड कमी होऊ शकतो. तुमच्या फोनच्या सेटिंगमध्ये जा आणि बॅकग्राउंड अप्स बंद करा.

**कॅशे आणि डेटा** : तुमच्या फोनवरील कॅशे आणि डेटा साफ केल्याने तुमचा इंटरनेट स्पीडदेखील सुधारू शकतो. तुमच्या फोनच्या सेटिंग्जवर जा आणि कॅशे आणि डेटा साफ करा.

**फोन रिस्टार्ट करा** : जर तुम्ही या सर्व सेटिंग्ज तपासल्या असतील तरीही तुमच्या इंटरनेटचा स्पीड वाढला नसेल तर तर तुम्ही फोन रिस्टार्ट करून पाहू शकता.


WI-FI **सेटिंग्ज** : तुमचा वाय-फायद वापरत असाल, तर तुमचा वाय-फाय पासवर्ड तुमच्यासोबत असेल आणि तुमचा वाय-फाय राउटर चालू माझा खात्री करा. तुम्ही तुमच्या वाय-फाय राउटरवर जाऊन ते रिबूट करण्याचा प्रयत्नदेखील करू शकता.

**अनावश्यक ॲप्स बंद करा :** तुमचा फोनवर चालणारे अनावश्यक ॲप्स बंद केल्यात तर तुमचा इंटरनेट स्पीड सुधारू शकतो.

**तुमचा फोन अपडेट ठेवा :** तुमच्या फोनसाठी नवीनतम सॉफ्टवेअर अपडेट्स इन्टॉल करणे महत्त्वाचे आहे. ही अद्यतने सहभाग कार्यदर्शन सुधारण्यासाठी आणि सुरक्षा दोषांचे पालन करण्यासाठी असतात.

**फोन क्लियर ठेवा :** फोन मेमरी क्लियर ठेवल्याने त्याची सुधारणा होऊ शकते. तुमच्या फोनवर अनावश्यक जागा घेणाऱ्या कोणत्याही फायली किंवा अप्स संग्रहित आहेत याची खात्री करा.

# इतिहास संशोधक डॉ. गणेश हरी खरे



**निमित्त**

महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध इतिहास-संशोधक डॉ. गणेश हरी खरे यांचा जन्म पनवेल येथे १० जानेवारी १९०१ रोजी झाला. शालेय शिक्षण पनवेल, बेळगाव येथे झाले. माध्यमिक शिक्षण द्रविड हायस्कूल, वाई येथे झाले. १९२० साली मॅट्रिक झाल्यावर त्यांनी सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयात प्रवेश घेतला (१९२०); तथापि महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडून असहकाराच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला.

असहकारितेच्या तत्त्वाप्रमाणे जामीन द्यायचे नाकारल्याने त्यांना १२ ऑगस्ट १९२२ पासून १ वर्ष बंदीवासाची शिक्षा देण्यात आली. बंदीवासातून सुटका झाल्यावर (१९२३) खरे ह्यांनी सातारा जिल्ह्या काँग्रेसचे एक चिटणीस म्हणून वर्षभर काम केले. १९२४ च्या उत्तरार्धापासून १९२९ च्या प्रारंभापर्यंत साताऱ्याच्या राष्ट्रीय शाळेत शिक्षक म्हणून त्यांनी नोकरी केली. बा. ज. शिंदे यांच्या समवेत मद्यपाननिरोधन, कोर्ट बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण यांसारख्या चळवळींचा जावळी तालुक्यात त्यांनी प्रचार केला; तसेच कोयना धरण योजनेविरुद्ध लोकजागृती केली.

पुढे १९२९मध्ये इतिहासाच्या अभ्यास-संशोधनासाठी ते पुण्यास भारत इतिहास संशोधक मंडळात गेले व तेथेच स्थायिक झाले. निवृत्तीपूर्वी मंडळाचे ते चिटणीस व अभिरक्षक होते (१९७३). १९७४ मध्ये त्यांची भारत इतिहास संशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून निवड झाली. पुणे विद्यापीठाने त्यांची डॉक्टरेटसाठी मार्गदर्शक व परीक्षक म्हणून नियुक्ती केली.

इतिहासाचा सर्वांगीण अभ्यास आणि संशोधन करता यावे, म्हणून त्यांनी हिंदी, उर्दू, फार्सी, कन्नड, संस्कृत, इंग्रजी वगैरे भाषांचा सखोल अभ्यास केला; तसेच इतिहासाशी संबंधित अशा नाणकशास्त्र, पुरातत्त्वविद्या, मूर्तिविज्ञान, पुरालेखविद्या यांचा अभ्यास केला. सर्व भारतभर प्रवास करून त्यांनी शेकडो ऐतिहासिक स्थळे तर पाहिलीच; पण नाणी, कागदपत्रे, पोथ्या व इतर ऐतिहासिक वस्तू जमा केल्या. सु. तीस इतिहासप्रसिद्ध घराण्यांचे कागद, २०,००० पोथ्या, ५,००० नाणी, ८० चित्रे, ३० ताम्रशासने व २०० इतर वस्तू एवढे प्रचंड साहित्य त्यांनी जमा केले. या सर्वांचा उपयोग सामान्य विद्यार्थ्याला तसेच चिकित्सक संशोधकाला व्हावा, म्हणून त्यांवर त्यांनी सु. ४०० लेख आणि पन्नासहून अधिक लहान-मोठी पुस्तके लिहिली. दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, (३ खंड - १९३०, ३४, ४९), मूर्तिविज्ञान (१९३९), संशोधकांचा मित्र (१९५१), महाराष्ट्राची चार दैवते (१९५८) ही त्यांची मान्यवर व प्रसिद्ध पुस्तके उल्लेखनीय आहेत.

अखिल भारतीय नाणक-परिषदेचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले (१९७४). तसेच त्यांचा एक गौरवग्रंथही प्रसिद्ध झाला आहे (१९७५). पुणे विद्यापीठाकडून सन्माननीय डी. लिट्. पदवी देऊन त्यांचा गौरव करण्यात आला (१९८४). महाराष्ट्रात इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी निष्ठावंत इतिहाससंशोधकांची जी परंपरा निर्माण केली, त्याच परंपरेत खरे मोडतात. इतिहास संशोधनाला जीवन सर्वस्व वाहणारे खरे यांचे कार्य मौलिक आहे. पुणे येथे त्यांचे ५ जून १९८५ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**

**(छाया : अनिकेत पवार)**



**रत्नागिरी : कोकणात नारळाची झाडे भरपूर असल्याने येथील जुन्या घरांना झावळ्या लावलेल्या पहावयास मिळतात.**

## आरोग्य प्रहर

### जाणून घ्या, लहान मुलं तोंडात बोट का घालतात?

तुमच्या घरी किंवा आजुबाजूला लहान मुले असतील तर त्यांना तोंडात बोटे घालताना तुम्ही हमखास पाहिले असेल. जेव्हा लहान मुले तोंडात बोटे किंवा अंगठा चोखत असतात आणि तुम्ही त्यांचा अंगठा काढलात तर ते तुमच्याकडे रागाने पाहतील किंवा मग जोरजोरात रडू लागतात. मुलांसाठी बोटे चोखणे खूप सामान्य असून मुल मोठे झाल्यावर बोटे चोखण्याची सवय आपोआप सोडून देतील असे पालकांनाही वाटते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की लहान मुलं पुन्हा पुन्हा तोंडात बोटं का घालत राहतात?



**कारण आणि उपचार** : लहान मुलांनी वारंवार तोंडात बोटे घालून त्यांना चोखणे खूप सामान्य आहे. यामागचे कारण आणि उपचार जाणून घेऊया.

**दात येणे** : लहान मुले दात येत असताना तोंडात बोटे घालतात.लहान मुलांचे दात बाहेर येतात तेव्हा ते हिरड्या खाजतात. अशावेळी तोंडात बोट घातल्याने त्यांना आराम वाटतो. यामुळेच ५ ते ६ महिन्यांची मुले तोंडात बोटे घालताना तुम्ही पाहिले असेल.

**झोप आल्यावर** : लहान मुले अनेकदा झोपेत असतानाही तोंडात बोटे घालू लागतात. जर तुमचे मूलंही दूध प्यायल्यानंतर तोंडात बोट घालून चोखत असेल तर त्याला झोप आलेली असू शकते.

**भूक लागल्यावर** : २ महिने ते १ वर्ष वयोगटातील मुले भूक लागल्यावर तोंडात बोटे घालतात. जर तुमचे मूलं १ ते २ तास खेळल्यानंतर वारंवार तोंडात बोट घालत असेल तर बाळाला भूक लागलेली असू शकेल. अशावेळी बाळाला लगेच दूध पाजण्याचा प्रयत्न करा.

**घाबरलेल्या स्थितीत** : अनेक वेळा मुलांना वातावरणात बदल झाल्यावर, अनोळखी व्यक्ती भेटल्यावर किंवा रस्त्याने चालताना तोंडात बोटे घालण्याची सवय असते. मुलं मनातू घाबरलेली असताना असं करु शकतात. या परिस्थितीत मुलाला शांत करण्याचा प्रयत्न करा. त्याच्या सभोवतालच्या गोष्टी बदलण्याचा प्रयत्न करा. त्याच्या सभोवताली हलके संगीत वाजवा, जेणेकरून त्याला चांगले वाटेल.

**आनंद व्यक्त करण्यासाठी :** लहान मुलांना बोलता येत नाही म्हणून ते तोंडात बोटे घालून आपला आनंद व्यक्त करतात. जर तुमचे मूल एखाद्याला पाहून हसत असेल आणि नंतर तोंडात बोट घालत असेल तर समजून घ्या की हा त्याचा आनंद व्यक्त करण्याचा एक मार्ग आहे.

# वीर यशवंतराव घाडगेंचा इतिहास भावी पिढीपर्यंत पोहचवूया -ना. आदिती तटकरे






**माणगाव : प्रतिनिधी**

शहीद वीर यशवंतराव घाडगे यांचा गौरवशाली इतिहास भावी पिढीपर्यंत पोहचला पाहिजे, असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

शहीद वीर यशवंतराव घाडगे यांचा जयंती समारंभ मंगळवारी (दि.९) प्रांत कार्यालय परिसर येथे उत्साहात पार पडला. त्या वेळी ना. आदिती तटकरे बोलत होत्या. समारंभाच्या अध्यक्षस्थानी घाडगे उत्सव समितीचे अध्यक्ष तथा प्रांताधिकारी डॉ. संदीपान सानप तर प्रमुख अतिथी म्हणून कर्नल किशोरकुमार मोरे उपस्थित होते.

समारंभास घाडगे उत्सव समितीचे सचिव तथा तहसीलदार माणगाव विकास गारुडकर, नगरपंचायत मुख्याधिकारी संतोष माळी, माजी सैनिक संघटना माणगाव अध्यक्ष विष्णु सावंत, बेळगाव येथून नायब सुभेदार गवस, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कुमार पोंदकुळे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगरध्यक्ष योगिता चव्हाण, वीरपत्नी वंदना यादव, दीपक चव्हाण, नगरसेविका ममता थोरे, जिल्हा युवक राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष शादाब गैबी, युवा नेते सुमित काळे, सौरभ खैरे आदींसह आजी-माजी सैनिक उपस्थित होते.

मान्यवरांनी व्हिक्टोरिया क्रॉस विजेते शहीद वीर यशवंतराव घाडगे यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून मानवंदना दिली. हा उत्सव सरकारी प्रशासन व माजी सैनिक संघटनेने आयोजित केले होते. मंत्री आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, बंद सैनिक विश्रामगृहासाठी निधीची तरतूद करून लवकरच सुरू करण्यात येईल, असे आश्वासित करून या विश्रामगृहामध्ये वीरमरण आलेल्या सैनिकांची माहिती दिल्यास भावी पिढीला मार्गदर्शक ठरेल. पुढील वर्षी वीर यशवंतराव घाडगे यांच्या जयंती समारंभास सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांना बोलविण्याचे आवाहन केले.

या वेळी बेळगाव येथून व्हिक्टोरीया क्रॉसपदक आणण्यात आले होते. शहीद वीर यशवंतराव घाडगे यांचे नातूदेखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. आयोजकांकडून मराठा बटालीयन रेजिमेंट व उपस्थित मान्यवर यांचा सत्कार करण्यात आला. समारंभाला उपस्थित सर्वांचे घाडगे उत्सव समितीचे सचिव तथा तहसीलदार माणगाव विकास गारुडकर यांनी आभार मानले.



## Extension to E –TENDER NOTICE

MAHATRANSCO

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs. 500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo: -7000029458**<br>**Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-63/2023-2024.**<br>Extension to RFx e-tender for work of permanent dismantling of 3 Nos. towers of 100kV Tambati – Malhotra Alexon Tap line from Loc. No. 1 to 3 under EHV Lines S/Dn Panvel under EHV(O&M) Division Panvel.<br>**Tender amount Rs. 3,07,782/-, EMD amount Rs. 5,000/-.** |
| 2 | Online Downloading theRFx | **10.01.2024, 18:00 Hrs. to 17.01.2024, 23:59Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 17.01.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **18.01.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V.(O&M) DN. PANVEL**



# वक्तृत्व स्पर्धेत रातवड विद्यालयाचा प्रथम क्रमांक



**माणगाव : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतीनिमित्त घेण्यात येणाऱ्या छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संस्थेच्या वक्तृत्व स्पर्धा शनिवारी (दि. ६)अभिनव विद्यामंदिर पारनाका, कल्याण येथे अत्यंत उत्साहाने झाल्या. या स्पर्धेत रातवड विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तीनही गटात प्रथम क्रमांक पटकाविला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिन औचित्य साधून स्पर्धेचे आयोजन प्रतिवर्षी संस्था स्तरावर केले जाते. विविधांगी विषयावर आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धेचे आयोजन केले जाते. विद्यार्थी अत्यंत उत्साहाने अभ्यासपूर्ण तयारी करून सदर स्पर्धेत सहभागी होतात. या स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण छत्रपती शिक्षण मंडळ कल्याणचे उपाध्यक्ष प्रा. ना. के. फडके, सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, चिटणीस मिनाक्षी गागरे , उपकार्याध्यक्ष विश्वास सोनवणे, ऋषिकेश केळकर व मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

स्पर्धेत माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयातील इयत्ता आठवीतून संस्कृती ऐत, इयत्ता नववीतून श्रेया मरवडे व इयत्ता दहावीतून कस्तुरी देवकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. यश संपादन केलेल्या विद्यार्थिनींचे संस्था अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, शालेय समिती अध्यक्ष संजय पालकर, मुख्याध्यापक महादेव जाधव यांनी अभिनंदन केले.



## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्री. नामदेव नारायण पारिंगे २) श्री. मयुर नारायण पारिंगे दोघेही रा. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड यांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री. वसंत महादेव घरत रा. मु. फ्लॅट नं. ३०३, चौथा मजला, झुलेलाल बिल्डींग, प्लॉट नं. १०३५, उरण नाका, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे ऊसर्ली बुद्रुक, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| ३३ | ४/१ | ०-१९-२०<br>पो.ख. ०-००-८०<br>एकूण ०-२०-०० | ०.३८ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**ठिकाण :- पनवेल,**
**दिनांक :- ०९/०१/२०२४**

**सही/-**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**
**मो.नं ८१०८५५८२८९**

पत्ता : शॉप नं १३०, मुन्सिपल शॉपींग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६





## उरण नगरपरिषद, उरण

### जाहिर निविदा सुचना २०२४

मा. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद, उरण, यांजकडुन खालील कामासाठी इच्छुक ठेकेदार / पुरवठादार कडुन दोन लिफाफा पध्दतीने सिलबंध दरपत्रक मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल |
|---|---|
| १ | उरण नगरपरिषदेच्या समाज विकास केंद्र करिता प्लास्टीक खुर्ची, टेबल, कपाट पुरविणेकामी ठेकेदार नियुक्त करणे बाबत. |
| २ | उरण नगरपरिषदेच्या कार्यालयीन कामकाज करीता संगणक साहित्य तसेच संगणक, प्रिंटर, लॅपटॉप व इतर अनुषंगिक साहित्य यांची देखभाल व दुरुस्ती करणेकामी वार्षिक ठेकेदार नियुक्त करणे बाबत. |
| ३ | उरण नगरपरिषद आरोग्य विभागा करिता हत्यारे औजारे तसेच इतर साहित्य पुरविणेकामी वार्षिक ठेकेदार नियुक्त करणे बाबत. |
| ४ | उरण नगरपरिषद कार्यालया सर्व विभागांकरिता बॅनर छपाई य अनुषंगिक छपाईची कामे करणेकरिता वार्षिक ठेकेदार नियुक्त करणे बाबत. |

**१. निविदा फॉर्म** फी-२०००/-रुपये **२.इसारा रक्कम** -५०००/-रुपये **३. कामाचा कालावधी**- कार्यादेश दिलेपासुन १५ दिवस

**निविदा सादरीकरण तपशिल.**

| अ.क्रं | तपशिल | पासुन | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द दिनांक | दिनांक १०/०१/२०२४ | |
| २ | निविदा सादर करणेची मुदत | दिनांक १०/०१/२०२४ | दिनांक २२/०१/२०२४ |
| ३ | निविदा कागदपत्र तपासणी दिनांक | दिनांक २३/०१/२०२४ | |
| ४ | निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक २५/०१/२०२४ रोजी अथवा नगरपरिषदेच्या सोईनुसार अन्य दिवशी. | |

**अटी व शर्ती**

१) निविदा फॉर्म कार्यालयीन (सुटीचे दिवस वगळून) वेळेत उरण नगरपरिषद भांडार विभागात विहित मुदतीत निविदा फॉर्म फी भरुन उपलब्ध होतील.
२) सिलबंध निविदा/दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीत कार्यालयीन (सुटीचे दिवस वगळून) वेळेत उरण नगरपरिषद कार्यालयात आवक जावक विभागात विहित मुदतीत स्विकारणेत येतील.
३) नमुद केलेल्या कामाकरिता इसारा रक्कम विहित मुदतीत लेखा विभागात स्विकारणेत येतील.
४) निविदा सादर करतेवेळी लिफाफा क्रं १ मध्ये १) पॅनकार्ड, २ नोंदणी प्रमाणपत्र ३) जी. एसटी प्रमाणपत्र ४) फॉर्म फी भरल्याची पावती ५) इसारा रक्कम भरल्याची पावती. ६) आयकर विवरणपत्र (मागिल ३ वर्षाचे) तसेच लिफाफा क्रं २ मध्ये दरपत्रक इ. कागदपत्र सिलबंध करुन दोन्ही लिफाफे विहित मुदतीत समक्ष नगरपरिषद आवक जावक विभागात सादर करणेत यावेत. पोस्टाने अथवा इतर मार्गाने पाठविलेल्या निविदा स्विकारणेत येणार नाहीत याची नोंद घ्यावी.
५) विहित मुदतीत प्राप्त निविदा शक्यतो त्याच दिवशी अथवा नगरपरिषदेच्या सोईनुसार उघडणेत येतील.
६) कोणतेही निविदा /दरपत्रक स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेस असेल.
७) प्रत्येक कामाकरिता स्वतंत्र निविदा सादर करावयाची आहे. फॉर्मफी व इसारा रक्कम प्रत्येक कामाकरिता भरणेची आहे.
८) याबाबत तपशिलवार माहिती नगरपरिषदेच्या भांडार विभागात मिळेल.

**सही/-**
**( समीर जाधव)**
**मुख्याधिकारी,**
**उरण नगरपरिषद, उरण**



# वाशी येथील अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता

**रोहे : प्रतिनिधी**

विश्वशांती नामयज्ञ श्री अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायणाचे आयोजन तालुक्यातील वाशी येथे ५ ते ८ जानेवारीदरम्यान करण्यात आले होते. या साप्ताहची सांगता हभप पुरुषोत्तम पाटील महाराजांच्या काल्याच्या किर्तनाने करण्यात आली.

रायगड भूषण हभप पुरुषोत्तम पाटील महाराज, यांनी आपल्या किर्तनात, खत म्हणून साखर कडुलिंबाच्या झाडाला टाकले असता कडुलिंबाचे फळ गोड होत नाही. त्याचप्रमाणे प्रारब्ध बदलता येत नाही. म्हणून परमार्थ करणे आवश्यक आहे. माणसाचे अंतर्मन शुद्ध आवश्यक आहे. धर्मासाठी अधर्म करू नये, असे सांगितले.

कीर्तनकार हभप नारायण महाराज वाजे पंढरपूर, कीर्तनकार हभप जगदीश महाराज जोशी त्रंबकेश्वर नाशिक, कीर्तनकार हभप शिवचरित्रकार गीतांजली झेंडे, धाटाव पंचक्रोशी अध्यक्ष पांडुरंग महाराज दळवी, भाऊ महाराज दळवी, मधुकर बामगुडे आणि त्यांची कमिटी यांनी सहकार्य केले. त्याचबरोबर मृदुंग वादक आणि गायक रवी मरवडे आणि त्यांचे सहकाऱ्यांनी उत्तम गायनाची साथ दिली.

या सप्ताहास आमदार अनिकेत तटकरे, ना. आदिती तटकरे यांच्या मातोश्री वरदा तटकरे, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव भगत तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी उपसभापती अनिल भगत, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, समीर सकपाळ, माजी सरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, दत्ता चव्हाण, अमित मोहिते, महेश बाबू, गुणाजी पोटफोडे, नामदेव म्हसकर, माजी उपसभापती रामचंद्र सकपाळ, रमा म्हात्रे, अरविंद मगर, आनंद मगर, चंद्रकांत भगत, संदीप मगर, राजेंद्र लहाने आदी उपस्थित होते.





## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
**पिन कोड - ४०२ २०१**

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दूरध्वनी/फॅक्स क्रमांक :-(०२१४१) २२२०८४/२२५०९६

### ई-निविदा सूचना क्र. ४१ सन २०२३-२०२४

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याडून सक्षम कंत्राटदारांकडून (जे निविदेत असलेल्या अटी व शर्ती पूर्ण करतील त्यांचे कडून )/ नोंदनीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | Construction Of Additional Second Third Floor of Civil Surgeon Office Ware House Building At District Civil Hospital Alibag Dist. Raigad | रु. ३,२०,३८,८६०.०० |
| २ | Reconstruction of 24 nursing quarters in civil hospital premises Tal.Alibag Dist. Raigad | रु. ३,२६,००,८३०.०० |
| ३ | Improvement of Bordi Thane Ulva Owale Chanje Rewas Reddi Road MSH-4 in Km. 289.000 to 294.000 in Tal. Murud, Dist. Raigad | रु. ३,४३,९७,२२६.०० |
| ४ | Construction of Highlevel Major Bridge on Tarankhop Pen Borgaon Road ODR-56 across Bhogavati River in Tal. Pen, Dist. Raigad. | रु. ३,२३,२४,४९१.०० |
| ५ | Improvement of Bordi Thane Ulva Owale Chanje Rewas Reddi Road MSH-4 in Km. 281.000 to 284.000 in Tal. Murud, Dist. Raigad | रु. २,१०,५१,४४५,०० |
| ६ | Improvement of Bordi Thane Ulva Owale Chanje Rewas Reddi Road MSH-4 in Km. 310.150 to 313.000 in Tal. Murud, Dist. Raigad | रु. २,०९,३३,४५१,०० |
| ७ | Construction of Concrete Pavement Road on Johe Rave Kasarbhat Road MDR-11 in km 0/00 to 0/500 Tal. Pen, Dist.Raigad. | रु. १,९७,१६,०९०,०० |
| ८ | Improvement to Vakrul Varavane Tilore Road M.D.R. 26 Km 0/00 to 4/00 & 6/700 to 8/500 Tal. Pen, Dist. Raigad | रु. २,४६,४७,१४४.०० |
| ९ | Improvement of Bordi Thane Ulva Owale Chanje Rewas Reddi Road MSH-4 in Km. 316.000 to 319.545 in Tal. Murud, Dist. Raigad | रु. २,१०,५८,५९५.०० |
| १० | Improvement of Bordi Thane Ulva Owale Chanje Rewas Reddi Road MSH-4 in Km. 313.000 to 316.000 in Tal. Murud, Dist. Raigad | रु. २,१०,२७,०२८.०० |
| ११ | Improvement of Bordi Thane Ulva Owale Chanje Rewas Reddi Road MSH-4 in Km. 305.500 to 309.500in Tal. Murud, Dist. Raigad | रु. २,१०,६१,०३७,०० |
| १२ | Improvement of Bordi Thane Ulva Owale Chanje Rewas Reddi Road MSH-4 in Km. 302.000 to 305.000in Tal. Murud, Dist. Raigad | रु. २,१०,४३,९७६.०० |
| १३ | Improvement of Bordi Thane Ulva Owale Chanje Rewas Reddi Road MSH-4 in Km. 299.500 to 301.500 in Tal. Murud, Dist. Raigad | रु. २,०६,०४,६३१,०० |
| १४ | Improvement of Bordi Thane Ulva Owale Chanje Rewas Reddi Road MSH-4 in Km. 295.000 to 298.000 in Tal. Murud, Dist. Raigad | रु. २,१०,४६,८०६,०० |
| १५ | Improvement of Bordi Thane Ulva Owale Chanje Rewas Reddi Road MSH-4 in Km. 285.000 to 288.000 in Tal. Murud, Dist. Raigad | रु. २,१०,२२,६२२.०० |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १०/०१/२०२३ (स.१०.००) ते दिनांक ०४/०५/२०२२ (सं.१८.००)
निविदापूर्व बैठक :- मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दि. १६.०१.२०२४ रोजी दु. ३.०० वाजता (अनु. क्र.१ ते ४)
:- मा. अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे दालनात दि. १९.०१.२०२४ रोजी दु. ३.०० वाजता (अनु. क्र.५ ते १५)
ई-निविदा उघडणे :- दिनांक २९/०१/२०२४ (दु. ३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, रायगड, ( सा.बां.) मंडळ कोकणभवन, नवी मुंबई

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/५०/२०२४**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, अलिबाग - ४०२ २०१**
**दिनांक :- ०२/०१/२०२४**

**सही/-**
**(जे. ई. सुखदेवे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विभाग, अलिबाग,**
**जि. रायगड**





## जाहिर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. अरुण संपतराव पाटील, राहणार १२०६/४२ए, लोकमत भवन, जे. एम. रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४. मौजे कसळखंड, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील तपशीलवारपणे नमूद केलेली मिळकत संबंधित वर्तमान मालक श्री. अर्जुन रतनसिंह राठोड, राहणार २०१, सिद्धगिरी अपार्टमेंट, डी. के. सांडू मार्ग, जॉय हॉस्पिटल जवळ, चेंबूर, मुंबई-४०००७१ यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाचा व्यवहार संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशील दरम्यान झाला आहे.

संदर्भित मिळकत पूर्णतः निर्वेध, बोजा विरहित व बिनजोखमी असल्याबाबतचा अहवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिला आहे. यावरही सदर मिळकतीत अथवा त्यापैकी कोणत्याही भागात अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार, वापर, वहिवाट, कब्जा, गहाण, दान, करार, मदार, पोटगीचा हक्क, इतर हक्क असल्यास त्यांनी ही सूचना सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत तशी लेखी हरकत आमच्याकडे कागदोपत्री, पुराव्यानिशी नोंदवून आमची खात्री पटवून देण्याची आहे.

विहित मुदतीत अशी कोणती लेखी हरकत न आल्यास आमचे अशील त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर येणारी कोणतीही हरकत माझे अशील यांचेवर बंधनकारक असणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-कसळखंड, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड येथील**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | पोट खराबा | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११३ | १ | ०८ हे.५३ आर | ००हे ७९ आर | ०९ हे. ३२ आर | १७ रु. ०६ पैसे |

यापैकी विद्यमान मालकांचे क्षेत्र ०७ हे. ७३ आर, अधिक पोटखराबा ०० हे ७९ आर असे एकून क्षेत्र ०८ हे. ५२ आर असून आकार १४ रु. ४६ पैसे आहे.

सदर मिळकतीस चतुर सीमा खालील प्रमाणे:-
पूर्वेस- स.नं.१४ व ९७ पैकी मिळकत
पश्चिमेस स.नं. ११५ पैकी मिळकत
दक्षिणेस- स.नं.१११ व ११२ पैकी मिळकत व मौजे भातानची शिव
उत्तरेस- स.नं.११० व १२० पैकी मिळकत

**सही/-**
**ॲड. किरण दत्तात्रय सावंत**
**मुंबई हायकोर्ट**

कार्यालयीन पत्ता :- ऑफिस क्रमांक १४, साई साज को-ऑपरेटिव्ह सोसायटी, प्लॉट ३, सेक्टर ५, बँक ऑफ महाराष्ट्र जवळ, नवीन पनवेल- ४१०२०६.

## निवडक



### वर्तना बांगर-सापळे सन्मानित

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिका संचलित माध्यमिक विद्यालय शिरवणे शाळा क्रमांक १०१ मधील मराठी विष होतकरू शिक्षिका वर्तना सुनील बांगर-सापळे यांना कोकण शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माध्यमिक शिक्षणाधिकारी ठाणे दहितुल्ले यांच्या हस्ते मानाचा फेटा, सन्मानपत्र, मायेची शाल, पुस्तक भेट देऊन सन्मानित करण्यात आले. सादर कार्यक्रमास आमदार किसन कथोरे (मुरबाड), आमदार बालाजी किणीकर (अंबरनाथ) आमदार निरंजन डावखरे (पदवीधर कोकण) माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

### सानपाड्यात वधू-वर मेळावा



**नवी मुंबई :** सानपाडा येथे मराठा विकास प्रतिष्ठानच्या वतीने ६ जानेवारी २०२४ रोजी केमिस्ट भवन येथे १४ वा मराठा समाजाचा वधू-वर मेळावा झाला. या मेळाव्यात जवळजवळ ४०० ते ४५० वधू-वर व पालक उपस्थित होते. या मेळाव्यासाठी सानपाडा येथील नवी मुंबई केमिस्ट असोसिएशनचे सचिव सुनील छाजेड व अध्यक्ष राकेश नलावडे, नगरसेवक सोमनाथ वासकर, दशरथ भगत, भाऊ भापकर, सुनील कुरकुटे, मिलिंद सूर्याराव, आबा उर्फ दशरथ जगताप, पांडुरंग आमले, बाबाजी इंदोरे, शंकरशेठ माटे, विसाजी लोके, मंगेश आमले, नंदा डेरे, सुभाष थोरात, सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारुती कदम, उपाध्यक्ष विठ्ठल गव्हाणे, उद्योगपती बाळासाहेब विचारे उपस्थित होते.

### महेश साळुंके यांना पुरस्कार प्रदान



**पनवेल :** विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून केलेल्या कार्याची दखल प्रशिक एज्युकेशन सोसायटी ने दखल घेऊन यंदाच्या वर्षी त्यांना विशेष पुरस्कार देऊन महेश साळुंके यांना मनोज संसारे स्मुती संघर्षयात्री गौरव पुरस्कार अर्थात प्रशिक सन्मान २०२३ ने सन्मानित करण्यात आले आहे. प्रशिक एज्युकेशन सोसायटी देवीचा पाडा नावडा पनवेल येथील आयोजित कार्यकमात अनेक मान्यवरांना विविध समाजकार्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. या वेळी महाराष्ट्र सचिव अरुण जाधव, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष विजय धोत्रे, पनवेल येथील मनोज कांबळे, भरत दातार, मुंबई चेंबूर येथील सुमित हिरवे, रमेश रुपवते हे त्यावेळी उपस्थित होते.

### बेलापूर येथे व्याख्यानमाला

**नवी मुंबई :** सीबीडी-बेलापूर येथील 'ब्रह्मसंस्कृती' या संस्थेने तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन केले असून ती १९, २० व २१ जानेवारी २०२४ रोजी रोज संध्याकाळी ७ वाजता कल्पतरू हौसिंग सोसायटी, सेक्टर ८इ, सीबीडी बेलापूर येथे पार पडेल. विख्यात प्रवचनकार आणि व्याख्यात्या धनश्री लेले ज्ञानेश्वरीतील १३ वा अध्याय -'क्षेत्र क्षेत्रज्ञ योग' या विषयावर निरुपण करतील. कार्यक्रम सगळ्यांसाठी खुला आहे.

### प्रजासत्ताक दिन पूर्वतयारीची बैठक

**नवी मुंबई :** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या अनुषंगाने पूर्व तयारीची बैठक कोकण विभागाच्या सामान्य शाखेचे उपायुक्त अजित साखरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. २६ जानेवारी, २०२४ रोजी मुख्य शासकीय ध्वजारोहण कळंबोली पोलीस मुख्यालय मैदानावर होणार आहे. त्या अनुषंगाने बैठकीत मार्गदर्शन करताना श्री. साखरे यांनी कोकण भवनातील सर्व विभागाने हा सोहळा यशस्वीरित्या व उत्साहात साजरा करण्याबाबत सूचना दिल्या.

# पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या ठिकाणी भव्य मंडपामध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी १२ जानेवारीला सूमारे सव्वा लाख नागरिकांना संबोधित करणार आहेत. याच कार्यक्रमात विविध सरकारी प्रकल्पांचा उद्घाटन सोहळा पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणार असल्याने नवी मुंबई पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात येणार आहे.



देशाच्या पंतप्रधानांच्या मुख्य उपस्थित होणारा सोहळा यशस्वी व सुरक्षितपणे पार पडण्यासाठी नवी मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी चार हजारांहून अधिक पोलीस बंदोबस्तासाठी तैनात करण्याचे नियोजन आखले आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात महिला पोलिसांचा समावेश असणार आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये होणाऱ्या सोहळ्यात सूरक्षेत कोणतीही ढिलाई राहू नये यासाठी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या आहेत. १२ जानेवारी उलवे येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या मैदानावरील भव्य मंडपामध्ये होणाऱ्या कार्यक्रमाच्या पूर्वीपासून बंदोबस्त लावला जाण्याची शक्यता आहे. नवी मुंबई व पनवेलमधील मागील दोन दिवसांपासून वेळेची मर्यादा तोडून चालणाऱ्या लेडीज सर्व्हीस बारवर पोलिसांचे धाड सत्र सुरू झाले आहे.

नवी मुंबईत मागील काही दिवसात अवैधपणे वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची धरपकड पोलिसांनी केली आहे. साडेसहा लाख चौरसफुटाचे भव्य मंडप आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या ठिकाणी उभारण्यात आले असून या मंडपात प्रवेशासाठी चार स्वतंत्र प्रवेशद्वार आहेत. प्रवेशद्वारावर पोलिसांचा कडेकोट पहारा असणार आहे. सामान्य नागरिकांसाठी आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या मंडपापर्यंत येण्यासाठी वेगळे द्वार आहेत.

१२०० बसगाड्या उभ्या राहील एवढ्या क्षमतेचे वाहनतळावर पोलिसांची करडी नजर असणार आहे. कार्यक्रमाला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मेटल डिटेक्टर यंत्राच्या तपासणीतून मंडपामध्ये प्रवेश दिला जाणार आहे.

# रस्ते सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

सीबीडी बेलापूर येथील पी.ई. एस सेंट्रल स्कूलचा विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा विषयक प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांना आपल्या दैनंदिन जीवनामध्ये रस्ता ओलांडताना घ्यावयाची काळजी, सुरक्षित प्रवास शालेय वाहातुक करणाऱ्या, स्कूलबस, रिक्षा आदी वाहनातून प्रवास करताना आपण कसे सुरक्षित राहिले पाहिजे, या बाबतचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांसमोर बेलापूर येथील वाहतूक पोलीस कार्यालयाच्या वतीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाघ यांनी दिले.

याचबरोबर विद्यार्थ्यांच्या जीवनातील सायकल वापरण्याचे महत्त्व पटवून दिले. निरनिराळ्या स्लोगन व फलकांच्या माध्यामांतून अपघातपासून कसे दूर राहता येईल याबाबत उदाहरणासह सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना आपल्या भावी शैक्षणिक वातावरणात आपत्ती व्यवस्थापनाविषयी अगदी बारकाईने मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या वेळी पी.ई.एस सेंट्रल स्कूल या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी. बी. पवार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वाहतूक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.




# प्रशासनाकडून तृतीयपंथी, वारांगनांची मतदार नोंदणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल घटनेने १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा अधिकार दिला आहे. सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क नागरिक बजावतात. तो अधिकार वारांगना आणि तृतीयपंथींना मिळावा, यासाठी पनवेल विधानसभा मतदारसंघ उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल मुडंके, पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांच्यासह निवडणूक विभागाने विशेष प्रयत्न केले आहेत.

पनवेलमध्ये आतापर्यंत ८५ तृतीयपंथी व वारांगनांना मुख्य प्रवाहात आणण्यात आले आहे. तृतीयपंथी हे आपल्या समाजातील घटक असले, तरी अद्यापही त्यांना पूर्णपणे स्वीकारण्यात आलेले नाही. त्यांच्याशी माणसांसारखा व्यवहार करण्यात येत नाही. त्यामुळे तृतीयपंथी हे सर्वाधिक उपेक्षितांमध्ये मोडतात. त्यांच्याएवढी हेटाळणी आणि कुचेष्टा कोणत्याही घटकाची होत नाही. त्यांना जगण्याची प्राथमिक संधीही नाकारल्या जातात. कुटुंबातही त्यांना प्रतिष्ठा नसते आणि आपुलकीची ऊबही मिळत नसते. असा चहुबाजूंनी उपेक्षा होणाऱ्या या घटकाला प्रतिष्ठा मिळावी, त्यांना सन्मान मिळावा, त्यांना अपमानास्पद वागणूक मिळू नये यासाठी काही सामाजिक चळवळी कार्यरत आहेत.

या चळवळीला काही अंशी यश आले आहे. त्याच अनुषंगाने तृतीयपंथी यांना मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी तृतीयपंथी व वारांगना महिलांची मतदार नोंदणी करण्यात आली आहे. त्यांचे मतदार यादीत नाव आल्यानंतर त्यांना मतदानाचा



हक्क आगामी निवडणुकीत बजावता येणार आहे. तहसीलदार विजय पाटील यांनी आयोजित केलेल्या शिबिरात लोकपरिषद स्वयंसेवी संस्था आणि आरजू फाऊंडेशन येथील तृतीयपंथींमध्ये तसेच देह व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांमध्ये मतदार नोंदणीविषयी जनजागृती करण्यात आली. त्यांच्याकडून नमुना नंबर सहाचे अर्ज भरून घेण्यात आले. तसेच व्होटर ॲपद्वारे मतदार नोंदणी फॉर्म कसे भरावेत याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी २९ तृतीयपंथींची नवमतदार म्हणून नोंद करण्यात आली. त्यानुसार पनवेलमध्ये आतापर्यंत ८५ तृतीयपंथी व वारांगनांची मतदार नोंदणी झाली आहे. यानिमित्ताने समाजातील उपेक्षित घटक असलेले तृतीयपंथीय व वारांगना यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम पनवेल तहसील करत आहे.

पनवेल तहसीलमार्फत तृतीयपंथींचे मतदार यादीत फक्त नाव नोंदणी केली नाही, तर ज्या तृतीयपंथींना घरच्यांनी नाकारले होते, त्यांना ओळख निर्माण करून देण्याचे काम केले आहे. २९ तृतीयपंथींना पनवेल तहसीलने नाव व पत्ता दिला आहे. त्यामुळे त्यांना नवीन ओळख निर्माण झाली आहे.

**काही तृतीयपंथीयांना स्वतःचे नाव, गाव, पत्ता काहीच माहिती नव्हते. समूहामध्ये ज्या नावाने हाक मारेल तेच नाव पडले होते. अशा वेळी पनवेल तहसीलमार्फत त्यांना एक ओळख निर्माण करून दिली आहे.**
**-विजय पाटील,**
**तहसीलदार, पनवेल**

**सुरुवातीला आम्ही नकार देत होतो. समाजाचा आमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. आम्ही आसू किंवा नसू समाजाला काही फरक पडत नाही; परंतु अधिकाऱ्यांनी समजावून आम्हाला नवीन ओळख दिली.**
**-माणसी जानी, आरजू फाऊंडेशन**





**पनवेल : न्हावाशेवा-शिवडी अटल सेतूचे लोकार्पण १२ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या उपस्थितीत गावोगावी बैठका घेऊन नियोजन करण्यात येत आहे. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, भाजप कार्यकर्ते जगदीश शेळके यांच्या नववर्ष दिनदर्शिकेचे प्रकाशन तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे आदी उपस्थित होते.**

# पाणदिवे येथील शिबिरास रक्तदात्यांचा उत्तम प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

न्हावा शेवा सी.एच.ए. संघटना नोंदणीकृत न्हावा शेवा सी.एच.ए.आधार सामाजिक संस्था म्हणून कार्यरत आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून रविवारी (दि. ७) श्री दत्त मंदिर पाणदिवे येथे समर्पण ब्लड सेंटर कोप्रोलीच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात ११६ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

याआधी न्हावा शेवा सी.एच.ए. संघटना म्हणून कार्यरत असलेल्या आणि सध्या नोंदणीकृत न्हावा शेवा सी.एच.ए. आधार सामाजिक संस्था म्हणून नामांतर झालेल्या संस्थेच्या माध्यमातून रक्तदान शिबिरासारखा सामाजिक उपक्रम हाती घेऊन सामाजिक क्षेत्रात पाऊल टाकले आहे.

दिवसभरात उरण तालुका महिला भाजप अध्यक्ष राणी म्हात्रे, चिटणीस निशाताई म्हात्रे, पूर्व विभाग भाजप अध्यक्ष शशिभाई पाटील, गोवठणे महिला भाजप अध्यक्षा विश्रांती म्हात्रे, सारडे गावचे सरपंच रोशन पाटील, वशेणी गावचे माजी सरपंच प्रसाद पाटील, छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश म्हात्रे, पत्रकार विठ्ठल ममताबादे, कैलास पाटील, सामाजिक कार्यकर्ते गोरख ठाकूर, विनोद म्हात्रे, नंदकुमार पाटील, यु ट्यूब स्टार आणि नाट्यकलाकार रोशन घरत, सर्व क्षेत्रातील व्यक्तींनी या शिबिरास भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

शिबिर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी आणि सर्व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.



# उरणमध्ये माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनात शिक्षकांचा सत्कार

**उरण : वार्ताहर**

एनआय् ८५-८६ ह्या माजी विद्यार्थांचे वार्षिक स्नेहसंमेलन माणकेश्वर मंदिराच्या मागे साहील हॉटेल अँन्ड रिसोर्ट येथे झाले. १९८५-८६ साली दहावीला असणाऱ्या विद्यार्थांच्या स्नेहसंमेलनात दरवर्षी विविध कार्यक्रम राबवले जातात. ह्या वर्षी त्यांना शिकवणाऱ्या गुरूजनांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

शिक्षकांनीही यथोचित मार्गदर्शन करून त्यांना बोलावल्या बद्दल ग्रुपचे आभार मानले. त्यावेळी शिक्षक व माजी विद्यार्थांनी एकत्र भोजनाचा आस्वाद घेतला. दुसऱ्या सत्रात विविध खेळांचे आयोजन करण्यात आल होत. समारोपाच्या वेळी निघताना अनेकांचे डोळे पाणावले.

कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी सुधीर म्हात्रे, चेतना घरत, कल्पना चव्हाण, आनंद कुलकर्णी, विवेक पाटील, दिगंबर काठे, तसेच साहील रिसोर्टचे मालक माजी विद्यार्थी दीपक पाटील यांनी विशेष प्रयत्न केले.



# विद्यार्थ्यांना सायबर आणि महिला सुरक्षेबाबत मार्गदर्शन



**पनवेल : वार्ताहर**

रेझिंग डे सप्ताह अंतर्गत पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थ्यांना शस्त्र तसेच सायबर सुरक्षा व महिला सुरक्षेबाबत माहिती देण्यात आली.

पोलीस दल स्थापना दिनाचे औचित्य साधून रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात आला. त्या अनुषंगाने वाजे हायस्कूल येथील सातवी ते दहावीचे विद्यार्थी अथवा शिक्षकवर्ग यांना पोलीस वर्धापन दिनाबाबत, पोलीस ठाण्याची कार्यपद्धती, सायबर सुरक्षा व महिला सुरक्षा, गुड टच बॅड टच व यापासून घ्यावयाची काळजी याबाबत योग्य ते मार्गदर्शन करून मुलांच्या शंकांचे निरसन केले.

या वेळी वेळी हायस्कूलचे एकूण १०० ते १२५ विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकवर्ग उपस्थित होता. पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर आणि कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# सीकेटी विद्यालयाच्या मराठी विभागाचे गुरुवारी स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या मराठी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विभागाचे २८वे वार्षिक स्नेहसंमेलन २०२३-२४ गुरुवारी (दि. ११) सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आले आहे.

गड किल्ले महाराष्ट्राचे या शीर्षकाखाली तसेच संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्या वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या समारंभाचे प्रमुख पाहुणे प्रवीण मुंडे (अवर-सचिव, शालेय शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई) आणि दिपा परब-गवस (अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, अलिबाग) आहेत. विशेष अतिथी म्हणून संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय शंकर पाटील, भाजप ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, श्रीवर्धन तालुका गटशिक्षणाधिकारी नवनाथ साबळे, पनवेल मनपा माजी नगरसेवक समीर ठाकूर यांची उपस्थिती असेल. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, मुख्याध्यापक सुभाष मानकर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेत आहेत.

## निवडक

### आदर्श पतसंस्थेतर्फे रक्तदान शिबिर



**अलिबाग** : आदर्श नागरी सहकारी पतसंस्था अलिबागच्या श्रीबाग शाखेच्या वर्धापदिनानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ७० जणांनी रक्तदान केले. 'आदर्श'तर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या रक्तदान शिबिरांमध्ये संकलित झालेल्या रक्ताचे कार्ड्स आदर्श पतसंस्थेत ठेवलेले असते. ज्या गरजू रुग्णांना रक्ताची आवश्यकता भासते त्या रुग्णांना पतसंस्थेमधून कार्ड्स दिले जातात आणि त्या बदल्यात रुग्णांना रक्तपेढीतून मोफत रक्त उपलब्ध करून दिले जाते.

### योगेश दवटे यांना गझलकार पुरस्कार

**मुरूड** : ललित कला फाउंडेशन ठाण्यातर्फे उगवत्या गझलकारांना प्रोत्सहन देण्यासाठी विविध ठिकाणाहून स्वतः बनवलेल्या गझल मागवण्यात आल्या होत्या. यामधून मुरूडमधील योगेश दवटे यांची गझल सम्राट सुरेश भट पुरस्कार २०२३करीता निवडण्यात आली. गायक व संगीतकार डॉ. कुणाल इंगळे यांच्या हस्ते योगेश दवटे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. या वेळी ललित कला फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मण शिवणेकर, प्रमुख अतिथी भागवत बनसोडे, प्रा. संजय घरडे, गझलकार सुनील ओव्हाळ, कवी व गझलकार काशिनाथ महाजन, रंगकर्मी व गझलकार श्रीनिवास गडकरी, गायक व संगीतकार डॉ. कुणाल इंगळे आदी उपस्थित होते.



# रब्बी हंगामासाठी कालव्याचे पाणी सोडले

## १२०० हेक्टर जमिनीवर होणार पेरणी; शेतकऱ्यांकडून कामे सुरू

**माणगाव : प्रतिनिधी**

काळ प्रकल्पांतर्गत डोलवहाळ बंधाऱ्याचे पाणी डाव्या कालव्यातून माणगाव तालुक्यातील शेतीला १५ दिवस उशिरा शेतात आले. शेतकरी आपल्या रब्बी हंगामाच्या भातपेरणीच्या कामाला लागला आहे. उशिरा का होईना, पण यंदाचे वर्षीही कालव्यांच्या सफाईची कामे पाटबंधारे विभागाने हाती घेतली आहेत.



अतिवृष्टीमुळे या कालव्यात माती, दगड, गाळ त्याचबरोबर शेवाळ व झाडेझुडपे वाढली होती. स्वच्छता केली नसल्याने शेतकरी चिंतेत होते. अखेर शेतात पाणी आल्याने शेतकऱ्याने आपली पेरणी करण्यास सुरुवात केली. यंदाचे वर्षी १२०० हेक्टरवर भात पेरणी होणार आहे.

तालुक्यातील शेतकरी चांगलाच रब्बी हंगामाच्या मशागतीच्या कामाला लागला असून रब्बी हंगामातील पिक घेण्यासाठी आपल्या शेताची मशागतीची कामे करण्यात मग्न झाला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही १५ डिसेंबरला कालव्याला पाणी सुटेल, या डेडलाईनकडे शेतकऱ्यांचे डोळे लागले होते. यांत्रिक विभागाकडून मशनरी यंदाचे वर्षी एकच उपलब्ध झाल्यानंतर कालव्याच्या सफाईचे काम संत गतीने झाले. अनेक ठिकाणी कालव्याची कामे करणे बाकी राहिल्याने ती कामेही केली जातील, अशी माहिती माणगाव पाटबंधारे उपविभागाचे अधिकारी श्रीकांत महामुनी यांनी दिली. अनेक शेतकरी भातपिक व कडधान्यांची पिके घेतात.

तालुक्यात दुपिकी भातपिक शेतकरी घेतात. कालव्याच्या पाण्यावर शेकडो हेक्टर भातपीक घेतले जाते. रब्बी हंगामातील हे पिक शाश्वत असून शेतकरी मोठ्या प्रमाणात भात पिकाची लागवड करतो. यातून कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी घरी धान्य ठेवून उर्वरित धान्य बाजारात विकतो. त्यामुळे त्याचे आर्थिक उत्पन्न वाढते. त्याचबरोबर गुरांसाठी भाताचा पेंडा वैरण म्हणून त्याला मिळतो. कालव्याची कामे शासनांनी वेळीच हाती घेऊन माणगाव तालुक्यातील जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली आल्यास तालुका सुजलाम् सुफलाम् होईल व माणगावच्या आर्थिक उत्पन्नाचा स्तर उंचावेल.

२०१८मध्ये चार हजार ९५३ हेक्टर सिंचनापैकी भातशेती, फळबाग व कलिंगडे, भाजीपाला यासाठी १२४८ हेक्टर सिंचन झाले होते. यंदाचे वर्षी माणगाव शाखेवर ७९.३२ हेक्टर जमिनीवर तर मोर्बा शाखा ६१.२३ हेक्टर जमिनीवर सिंचन करण्यात आले होते. गोरेगाव शाखा कालवा गेल्या वर्षी लिकेजमुळे बंद होता. धरणाचीवाडी ते माणगाव हे ३० किमी अंतर आहे.

# शेतीसाठी ड्रोन वापरावर मिळणार अनुदान

## अर्ज करण्यासाठी कृषी विभागाचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शासनामार्फत शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करता यावी, यासाठी विविध उपकरण अनुदान तत्त्वावर उपलब्ध करून दिले जातात. नुकतीच फवारणीसाठी ड्रोन अनुदान योजना शासनामार्फत शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आली. शेतीसाठी ड्रोनचा वापर करायचा असेल तर शेतकऱ्याला जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात अर्ज करावा लागणार आहे. त्यामुळे तळा कृषी विभागाकडून शेतकरी, कृषी पदवीधर व शेतकरी उत्पादक कंपनी यांना ड्रोन खरेदीसाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



ड्रोनचा वापर शेतीसाठी करण्यासाठी शासनाकडून पावले उचलली गेली आहेत. शेतकरी उत्पादक कंपन्या, विविध शेतकरी गट, कृषी पदवीधर किंवा व्यक्तगत शेतकरी यांना ड्रोन खरेदीवर अनुदान मिळणार आहे. यासाठी जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात अर्ज करावा लागणार आहे.

या अर्जांना राज्य आणि केंद्र सरकारची परवानगी मिळाली तरच ड्रोन खरेदी करता येणार आहे, तसेच शेतकऱ्यांना ड्रोनच्या सहाय्याने फवारणी करण्यासाठी सर्वप्रथम शासनामार्फत ड्रोन फवारणी करतेवेळी कशाप्रकारे हाताळावा याबद्दलची संपूर्ण माहिती व औषध फवारणी करतेवेळी कशाप्रकारे ड्रोन हाताळणी करावी, याबद्दलचा संपूर्ण प्रशिक्षण शेतकऱ्यांना दिले जाणार आहे.

ड्रोनचा वापर पिकांची पाहणी करण्यासाठी तसेच पिकांवरील रोगांची तपासणी करण्यासाठी करता येतो. पिकांवर फवारणी करण्यासाठी कमी वेळेत जास्तीत जास्त क्षेत्रावर ड्रोनच्या मदतीने फवारणी करता येते. ड्रोनला लावलेल्या कॅमेऱ्याच्या मदतीने पिकांवरील किड रोगांची माहिती ठेवता येते. विद्यापीठे व सरकारी संस्था १०० टक्के अनुदान (१० लाखांपर्यंत) शेतकरी उत्पादक संस्था ७५ टक्के अनुदान (साडेसात लाख रुपये अनुदान) कृषी पदवीधारकाने अवजारे सेवा केंद्र सुरू केल्यास पाच लाखांपर्यंत अनुदान इतर शेतकऱ्यांना ४० टक्के किंवा चार लाख अनुदान देण्यात येणार आहे.

### माकडे पळवून लावण्याचे उपकरण

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

तालुक्यात अनेकदा माकडे, डुक्करांमुळे शेतीचे व परसबागेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. माकडे व वानरे तर गावासह शहरातदेखील धुडगूस घालताना दिसतात. यांना पिटाळून लावण्यासाठी पीव्हीसी पाईपचे एक देशी उपकरण सध्या विक्रीसाठी आले आहे.

प्लास्टिकच्या पाईपपासून बनविलेले हे उपकरण हाताळण्यास सोपे आहे. यामध्ये एका छोट्या होलमधून कॅल्शियम कार्बाईडचा छोटा तुकडा टाकून त्यावर थोडे पाणी टाकून एक किंवा दोनदा पाईप हलवायचा व त्यानंतर पाठी लावलेले लायटर दबायचे आणि लागलीच पाइपमधून मोठा आवाज निघतो. या आवाजाने माकडे, डुक्कर व इतर वन्य पशुपक्षी पळून जातात. त्यांना कोणतीही दुखापत होत नाही.

हे उपकरण घेऊन येणारे विक्रेते बाजार सर्वांना याचे प्रात्यक्षिक करून दाखवत आहेत. त्यामुळे नागरिकही पाहण्यासाठी गर्दी करीत आहेत.

### किल्ले रायगड येथे गडरोहण स्पर्धा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, स्थानिक उत्सव समिती, महाडतर्फे स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्ताने प्रतिवर्षीप्रमाणे २८ जानेवारी २०२४ रोजी किल्ले रायगड येथे गडरोहण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

इच्छुक स्पर्धेकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, स्थानिक उत्सव समितीचे अध्यक्ष त्रिंबक कृष्णाजी पुरोहित यांनी केले आहे.

# रांगोळीतून साकारले तान्हुल्याचे हुबेहुब हावभाव

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील नांदगाव येथील रांगोळीकार अनिरुद्ध खेडेकर यांच्या विविध रांगोळ्या प्रसिद्ध आहेत. रेवदंडा येथे नुकतीच एक रांगोळी स्पर्धा झाली. या स्पर्धेत अनिरुद्ध खेडेकर यांनी तब्बल १२ तासांची मेहनत घेत लहान बाळाला आंघोळ घालताना त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव जसेच्या तसे साकारून सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे.



आजच्या फोटोग्राफीच्या जमान्यात रांगोळीच्या माध्यमातून लहान बाळाचे स्नान जसेच्या तसे टिपून एक सुंदर चित्र काढल्याबद्दल सर्व स्थरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. अनिरुद्ध खेडेकर यांनी पाण्याचा मॉर्फ या रांगोळी प्रकरामध्ये सलग १२ तास काम करून ही रांगोळी साकारली आहे. या रांगोळीबाबत अनिरुद्ध खेडेकर यांनी सांगितले की, ही रांगोळी हायपर रिॲलिस्टिक प्रकारात मोडते. सर्वसाधारपणे पोर्ट्रेटमध्ये जास्त रांगोळ्या काढल्या जातात, परंतु माझे जे फॉलोअर्स व चाहत्यांकडून सतत काही तरी वेगळे चित्र साकारण्याची मागणी होती. त्याप्रमाणे मी हे चित्र साकारले आहे. बालकांच्या चेहऱ्यावरून ओघळणारे पाणी रांगोळीतून दाखवणे हे खरे माझ्यापुढे आव्हान होते. यासाठी मला सलग १२ तास मेहनत घ्यावी लागली.

या आधी अनिरुद्ध खेडेकर यांच्या जगातील सर्वात लहान रांगोळी गणपतीची एक रुपयाच्या नाण्यावर पोर्टेट रांगोळी साकारून हार्वर्ड बुक रेकॉर्ड लंडनमध्ये नोंद झाली आहे.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost in lakhs |
|---|---|---|
| Tend-50/23-24 7000002905 Re-floated | AMC of ABT metering system installed at various substations, under EHV (O&M) Circle, Panvel | Rs. 25.00 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 09.01.2024 to 17.01.2024 up to 11:00 hrs, Opening date:-17.01.2024 @ 11:00 Hrs. Tender Fee- Rs. 500/-+ GST.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER, EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


# महालक्ष्मी प्रदर्शनात अलिबागचे भाकरीवाले पाटील 'सरस'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुंबई येथे २६ डिसेंबर २०२३ ते ७ जानेवारी २०२४दरम्यान महालक्ष्मी सरस विक्री आणि प्रदर्शन कार्यक्रम झाला. या सरस प्रदर्शनात रायगड जिह्यातील १७ समुहांनी सहभाग घेतला होता. प्रचंड प्रदिसादामुळे सर्वाधिक विक्री करण्याचा विक्रम अलिबागच्या भाकरीवाले पाटील समुहाने केला. उमेद अभियानामार्फत भाकरीवाले पाटील समुहाचा यथोचित भेटवस्तू, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचे स्टॉल, हातावरचे मांडे, पुरणपोळी, थालीपीठ, फिश थाळी, कोंबडी वडे, सावजी चिकन, मटन तसेच बाहेरच्या राज्यातील स्पेशालिटीचे खाद्यपदार्थांचे फूड स्टॉल या प्रदर्शनात लावण्यात आले होते.

अलिबागच्या भाकरीवाले पाटील यांच्याकडील कोंबडी वडे, सुरमई फ्राय, पापलेट फ्राय सोलकडीचा सर्वांनी आस्वाद घेतला. काही मुंबईकरांनी तर स्पेशल कोंबडी वडे आणि अस्सल मच्छी फ्रायचा आस्वाद घेण्यासाठी दोन वेळा भाकरीवाले पाटील समूह यांच्या स्टॉलला भेट दिली. त्यांच्या प्रचंड प्रदिसादामुळे सर्वाधिक विक्री करण्याचा विक्रम अलिबागच्या भाकरीवाले पाटील समुहाने केला. त्याबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड तसेच प्रकल्प संचालिका प्रियदर्शनी मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली समुहाने रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले होते. या वेळी जिल्हा समन्वयक म्हणून सिद्धेश चंद्रकांत राऊळ, जिल्हा व्यवस्थापक, विपणन यांचाही उत्कृष व्यवस्थापन केल्याबद्दल गौरव करण्यात आला.

महिला समन्वयक म्हणून उज्वला जगताप यांचाही सन्मान करण्यात आला.




**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
ई निविदा सूचना क्रमांक ११२/२०२३-२०२४ (मुंबई)
म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक क्षेत्र.. शिवमंदिर ते जी.डी. आंबेकर हायस्कूल पर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती करणे. | ₹ २,३४,८५,५०३.०० |
| २ | महाड औद्योगिक क्षेत्र सांडपाणी निःसारण योजना... रावधळ गावाजवळ गागेश्वरी नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधणे | ₹ ७,५३,६२,९६१.०० |
| ३ | महाड औद्योगिक क्षेत्र सांडपाणी निःसारण योजना... महाड औद्योगिक क्षेत्रातील जेबीएल सर्कल ते सामाईक सांडपाणी प्रक्रीया केद्रांच्या सांडपाणी संकलन टाकीपर्यंत अस्तित्वातील गुरूत्व स्पिरो सांडपाणी वाहिनी, नवीन ९०० मि.मी. व्यासाच्या एचडीपीई सांडपाणी वाहिनीचा पुरवठा करून, टाकणे व जोडणे. | ₹ ६,३४,५५,९२०.०० |
| ४ | महाड औद्योगिक क्षेत्र सांडपाणी निःसारण योजना.. महाड औद्योगिक क्षेत्रातील निवासी विभागातील एक्स झोन व आरएच झोनमधील विद्यमान गुरूत्व एसी प्रेशर सांडपाणी वाहिनी, ४०० मि.मी. व्यासाची एचडीपीई सांडपाणी वाहिनीचा पुरवठा करून टाकणे व जोडणे. | ₹ ५,६६,२६,७१४.०० |
| ५ | महाड औद्योगिक क्षेत्रसावित्री धरणालगत .... नदीकाठच्या मातीची धूप रोखण्याची उपाययोजना करण्यासाठी संरक्षणात्मक तरतूद करणे. | ₹ १,०५,९६,९७८.०० |

उपरोक्त अ.क्र. १ ते ४ वरील कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १६/०१/२०२४ ते दिनांक ३०/०१/२०२४ पर्यंत व अ.क्र. ५ वरील कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १६/०१/२०२४ ते दिनांक २४/०१/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त अ.क्र. १ ते ४ वरील कामांबाबत दिनांक १९/०१/२०२४ पूर्वी व अ.क्र.५ वरील कामाबाबत दिनांक १८/०१/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र. १ ते ४ वरील कामांबाबत दिनांक २३/०१/२०२४ पासून व अ.क्र. ५ वरील कामाबाबत दिनांक २२/०१/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



**पुनर्विकासासंबंधीची टेंडर नोटीस**

**माऊली को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी मर्यादित**
पनवेल या संस्थेने आपल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी नावाजलेल्या बिल्डर, विकासक, कंपन्या, भागीदारी संस्था पात्र अशा सर्वांकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहेत.
याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे:-
**माऊली को- ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड**
नोंदणी क्रमांक - पवल/हाउसिंग/(टिसी)/५४६/९०-९१, प्लॉट नंबर ५१७/१, ५१७/A-,५१८/१, ५१८/B भूखंडाचे क्षेत्रफळ - २२९६.४ स्केअर मीटर. सदस्य संख्या- ६६ माऊली को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी मर्यादित, गोदरेज प्लाझा जवळ, टिळक रोड, जुने पनवेल, केसर बाग बिल्डिंग समोर पनवेल, जिल्हा-रायगड.
**फोन नंबर:-** चारुदत्त पाध्ये :- ९३२३१९३८९२, ज. पा.म्हात्रे:- ९८२१४३३१३०, स्वप्नील महाजन :-९८६७६०३०२१ देवेन मराठे :-८९७६७९०५९९,
निविदा कागदपत्रे मिळण्याचे ठिकाण श्री बाळकृष्ण गोपाळ देव (जी - ८) **माऊली को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी मर्यादित,** गोदरेज प्लाझा जवळ, टिळक रोड, जुने पनवेल, केसर बाग, पनवेल,जिल्हा रायगड.
निविदा घेऊन जाण्याची व सादर करण्याची वेळ दुपारी ४ ते संध्याकाळी ६. निविदेची किंमत - ७५००/- ( सात हजार पाचशे फक्त) पैसे फक्त पेऑर्डर अथवा पनवेल येथे पेयेबल असणाऱ्या डीडी ने पाठवावेत पे ऑर्डर अथवा डीडी हा माऊली को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी या नावाने असावा.
**निविदापत्र नेण्याचा कालावधी १०/०१/२०२४ ते ३१/०१/२०२४ पर्यंत असून निविदा सादर करण्याची शेवटची तारीख दि. ३१/०१/२०२४** अशी आहे.
निविदेसाठी जमा केलेली रक्कम ही कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही. आपले देकार (ऑफर) हे निविदेत नमूद केलेल्या माहिती बरहुकूम असावेत. संस्थेला आवश्यकता वाटल्यास संस्था देकार/ऑफर सादर करणाऱ्या अधिकृत व्यक्तीशी चर्चा करू शकेल. एखादा देकार/ऑफर कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क संस्था राखून ठेवत आहे.
**सेक्रेटरी / अध्यक्ष**
**माऊली को ऑपरेटीव्ह हौ सोसायटी, पनवेल**





## उलवे नोड प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा उत्साहात

# शैलेश स्मृती तरघर संघ विजेता

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

शेलघर येथील मैदानावर रंगलेल्या उलवे नोड प्रीमियर लीग (युएनपीएल) क्रिकेट स्पर्धेत शैलेश स्मृती तरघर संघाने विजेतेपद पटकाविले. सनसिटी ब्लास्टर कोंबडभुजे संघ उपविजेता ठरला. या स्पर्धेस माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत १६ संघांचा सहभाग होता. सहा रात्री स्पर्धा खेळली गेली. विजेत्या शैलेश स्मृती तरघर संघाला चांदीचा चषक आणि ८० हजार रुपये देऊन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे विजेत्या संघातील १३ खेळाडूंना सायकल भेट देण्यात आली. उपविजेता सनसिटी ब्लास्टर कोंबडभुजे संघ चषक व ४० हजार रुपये बक्षिसाचा मानकरी ठरला.

मालिकावीर म्हणून अंकित कोळी (तरघर), उत्कृष्ट फलंदाज ऋषी नाईक (कोंबडभुजे), उत्कृष्ट गोलंदाज अविनाश डोलकर (तरघर) व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून पंकज घरत (खारकोपर) यांची निवड करून त्यांनाही बक्षीस देण्यात आले.

या वेळी सुधीर ठाकूर, सचिन घरत, रमेश घरत, अमर कडू, अमर पाटील, सुहास गोंधळी, मनोज नाईक, कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

# ‘लायन्स’च्या बुद्धिबळ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३१ए ४ची टॅलेंट हंट कमिटी, लायन्स क्लब ऑफ पनवेल, लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम आणि पनवेल बुद्धिबळ असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने खुली बुद्धिबळ स्पर्धा पनवेल येथील गोखले सभागृहात झाली. या स्पर्धेत १६०पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग देऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




या स्पर्धेचे उद्घाटन माजी प्रांतपाल मुकेश तनेजा यांच्या हस्ते, तर बक्षीस वितरण समारंभ द्वितीय प्रांतपाल संजीव सूर्यवंशी यांच्या हस्ते झाले. डिस्ट्रिक्ट कमिटी टॅलेंट हंटचे सुयोग पेंडसे यांनी कमिटीतर्फे समाजातील गुणवत्ता शोधण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित करीत असल्याचे सांगितले. उद्घाटक तनेजा आणि मुख्य अतिथी सूर्यवंशी यांनी स्पर्धेच्या आयोजनाबद्दल कौतुक केले.

या वेळी व्यासपीठावर डिस्ट्रिक्ट खजिनदार नयन कवले, जीएसटी चेअरमन प्रवीण सरनाईक, जीएलटीचे चेअरमन नमिता मिश्रा, डिस्ट्रिक्ट पदाधिकारी विजय गणात्रा, आलोक मिश्रा, पनवेल लायन्स अध्यक्ष सीताराम चव्हाण, पनवेल सरगम अध्यक्ष स्वाती गोडसे, कमिटी को-ऑर्डिनेटर संजय गोडसे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, संजय कदम यांनी स्पर्धेला भेट देऊन अभिनंदन केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बुद्धिबळ असोसिएशनचे समीर परांजपे, पाटील तसेच ‘लायन्स’चे अशोक गिल्डा, सुरभी पेंडसे, अलका चव्हाण, सुनील देशपांडे, संध्या महानुभाव आणि सर्व सभासदांनी सहकार्य केले.

# मोहम्मद शमीला अर्जुन पुरस्कार प्रदान



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते मंगळवारी (दि.९) अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अर्जुन पुरस्कार मिळालेला शमी हा ५८वा क्रिकेटपटू आहे. यामध्ये १२ महिला क्रिकेटपटूंचा समावेश आहे.

अर्जुन पुरस्कार मिळाल्यानंतर बोलताना मोहम्मद शमी म्हणाला की, ही माझ्यासाठी स्वप्नवत अशी घटना आहे. यासाठी सर्वप्रथम धन्यवाद! हा पुरस्कार मिळाल्याने मला आनंद होत असून स्वतःचा अभिमान वाटत आहे. अख्खं आयुष्य निघून जातं, लोक पुरस्कार बघत राहतात, पण मला ते मिळतंय यासाठी सर्व भारतीय चाहत्यांचे आभार.

वर्ल्डकपनंतर मोहम्मद शमी दुखापतीमुळे मैदानात उतरू शकला नाही. विश्वचषकात त्याची कामगिरी उत्कृष्ट होती. तो या स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज ठरला. शमी पहिले तीन सामने खेळला नाही, पण संधी मिळताच त्याने फलंदाजांची पळताभुई थोडी केली. त्याने विश्वचषकातील ७ डावात एकूण २४ विकेट्स घेतल्या. विश्वचषकाच्या अंतिम फेरीदरम्यान शमीला दुखापत झाली होती आणि अद्याप तो पुनरागमन करू शकलेला नाही. याबाबत शमी म्हणाला की, दुखापत होणे हा खेळाचा एक भाग आहे.

शमी पुढे म्हणाला, दुखापत हा खेळाचा एक भाग आहे, पुनरागमन करण्यासाठी थोडा वेळ लागू शकतो, पण सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे मला चाहत्यांकडून मिळालेले प्रेम. संघात लवकरात लवकर पोहचण्याचा प्रयत्न करीत आहे. हे माझ्यासाठी आणि या संघासाठी अधिक महत्त्वाचे आहे.

### भविष्यात प्रशिक्षक बनण्याची वॉर्नरची इच्छा

**सिडनी : वृत्तसंस्था**

कसोटी सामन्याच्या अखेरच्या डावात अर्धशतक आणि विजय अशा थाटात क्रिकेट कारकीर्दीला पूर्णविराम घेणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या डेव्हिड वॉर्नरने भविष्यात प्रशिक्षक बनण्याची इच्छा व्यक्त केली आहे. वॉर्नरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे, पण विविध व्यावसायिक लीगसाठी तो उपलब्ध असणार आहे.

निवृत्तीनंतर वॉर्नरने भविष्यात प्रशिक्षक बनण्याची इच्छा बोलून दाखवली. अर्थात, त्यापूर्वी मला पत्नीची परवानगी घ्यावी लागेल. इतकी वर्षे कुटुंबापासून दूर राहिल्यानंतर पुन्हा ती मला बाहेर राहून देईल की नाही हे माहीत नाही, अशी मिश्कील टिप्पणीही वॉर्नरने या वेळी केली.

# कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयात क्रीडा सप्ताह

**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या वतीने ४ ते १० जानेवारी या कालावधीत क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन खेळांचा आनंद लुटला.



या क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रमेश ठाकूर आणि कोटगाव ग्रामसुधार मंडळाचे अध्यक्ष निलेश पाटील यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य के.ए. शामा यांनी या वेळी विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन आपला ठसा उमटवावा व स्वत:सह महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाह केले, तर रमेश ठाकूर यांनी उत्तम आरोग्यासाठी खेळाचे महत्त्व खूप असून त्यातून व्यक्तिमत्व विकास होतो, असे प्रतिपादन केले.

या क्रीडा सप्ताहामध्ये गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक, उंच उडी, लांब उडी, १०० मीटर, ४०० व ८०० मीटर रनिंग, कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन इत्यादी वैयक्तिक स्पर्धा तसेच खो-खो, कबड्डी व क्रिकेट इत्यादी सांघिक स्पर्धा घेण्यात आल्या. या विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आपले कौशल्य दाखवले.

कोटगाव ग्रामसुधारणा मंडळाचे मैदान, बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल व महाविद्यालय कॅम्पसमध्ये या स्पर्धा घेतल्या गेल्या. या स्पर्धांच्या आयोजनामध्ये क्रीडा विभाग प्रमुख प्रा. ए.के. गायकवाड यांनी मेहनत घेतली तसेच प्रा. आर. टी. ठावरे, प्रा. डॉ. एम.जी. लोणे, अनुपमा कांबळे, प्रा दत्ता हिंगमिरे, पूजा गुप्ता, विनिता तांडेल आदी क्रीडा समितीचे सदस्य तसेच कार्यालयीन अधीक्षक तानाजी घ्यार, आयक्युएसी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण आदींनी मेहनत घेतली. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचाही सहभाग स्पर्धा आयोजनात होता.

# महाराष्ट्राच्या खेळाडूंची राष्ट्रीय बीच गेम्समध्ये दमदार कामगिरी

## पिंच्याक सिलॅट खेळात राखला दबदबा




**पाली : प्रतिनिधी**

दिव येथे सुरू असलेल्या बीच गेम्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी करताना एकूण तीन सुवर्ण, दोन रौप्य, चार कांस्य अशी नऊ पदके जिंकून पिंच्याक सिलॅट खेळात महाराष्ट्राचे टॉप थ्रीमधील अव्वल स्थान अबाधित ठेवले.

दिव बिच गेम्समध्ये मल्लखांब, टग ऑफ वॉर, बीच बॉक्सिंग, बीच व्हॉलीबॉल, बीच सॉकर, सी स्विमिंग, बीच कबड्डी आणि पिंच्याक सिलॅट असे एकूण आठ खेळ समाविष्ट करण्यात आले असून त्यात एकूण १२०० खेळाडूंनी सहभाग घेतला आहेत. त्यातील पिंच्याक सिलॅट खेळामध्ये भारतातील विविध राज्यातून निवडण्यात आलेल्या २२० खेळाडूंमध्ये महाराष्ट्र संघात १७ खेळाडू होते.

स्पर्धेचे उद्घाटन केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर, लेफ्टनंट गव्हर्नर विनय कुमार सक्सेना, लडाखचे लेफ्टनंट गव्हर्नर बी.डी. शर्मा, दिव दमण दादरा नगर हवेलीचे प्रशासक प्रफुल्ल पटेल, खासदार लालभाई पटेल यांच्या हस्ते झाले.

पिंच्याक सिलॅटचे बक्षीस वितरण दिवच्या जिल्हाधिकारी भानुप्रभा, इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले, सेंटर फॉर एक्सलन्स दिवचे संचालक निखिल देसाई, दिवच्या महापौर हेमलत्ता बेन, दमण व दिवचे डायरेक्टर ऑफ स्पोर्ट्स अरुण गुप्ता, मोहम्मद इकबाल, क्रीडा अधिकारी अक्षय कोटलवार, जनरल सेक्रेटरी तारिक अहमद झरगर, उपाध्यक्ष फिलिया थॉमस, दिव दमण पिंच्याक सिलॅट असोसिएशनचे सेक्रेटरी एलेक्स थॉमस यांच्या हस्ते झाला.

या स्पर्धेत प्रशिक्षकाची जबाबदारी ओमकार अभंग, अंशुल कांबळे, पूर्वी गांजवे, अमोल कदम, तृप्ती बनसोडे सुरेखा येवले यांनी बजावली.

फाईट इव्हेंट : ओमकार सानप, पियुष शुक्ला, भक्ती किल्लेदार सुवर्णपदक; टँडींग फाईट इव्हेंट व सोलो क्रिएटीव्हीटी : किर्णाक्षी किशोर येवले रौप्यपदक; फाईट इव्हेंट : शुभम गणेश किंगरे, समीक्षा सतिश सावंत, दिक्षा शंकर शिंदे, स्नेहल सचिन डांगे कांस्यपदक.

## ‘राम सिया राम’वर प्रतिक्रिया देत केशव महाराजने जिंकली भारतीयांची मने

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा फिरकीपटू केशव महाराज सध्या भारतात खूप लोकप्रिय क्रिकेटपटू बनत आहेत. यामागचे कारण म्हणजे त्याची मैदानावरील एन्ट्री. गेल्या काही काळापासून महाराज जेव्हा जेव्हा मैदानात येतात तेव्हा मैदानात ‘राम सिया राम’ भजन ऐकू येते. याबाबत बोलताना अखेर या आफ्रिकन गोलंदाजानेच आपली प्रतिक्रिया दिली आहे. त्याच्या वक्तव्याने भारतीय चाहत्यांचे मन जिंकले आहे.

पीटीआयशी बोलताना केशव महाराज म्हणाला, मी स्वतःहा आज जाहीरपणे मध्यमांसमोर हे सांगतो की, असे काहीतरी गाणे आहे जे मी येताच वाजवले जात आहे व ते पुढेही वाजवावे. भारत-दक्षिण आफ्रिका कसोटीदरम्यान त्यांना हे गाणे वाजवण्याची मी विनंती केली. माझ्यासाठी देव खूप महत्त्वाचा असून त्याचा आशीर्वाद नेहमीच माझ्या पाठीशी नेहमीच असतो. तो नेहमी मला मार्गदर्शन करतो आणि वेगवेगळ्या स्वरूपात संधी देत असतो. त्याच्या आशीर्वादामुळेच हे मी करू शकतो. हे गाणे मला तुमच्या आठवणीत ठेवेल, मैदानात जाताना बॅकग्राऊंडला राम सिया राम गाणे ऐकू आल्याने माझा खेळ अजून चांगला होतो. हे ऐकणे मला खूप प्रसन्न वाटते.




# सचिन तेंडुलकरने कोकणातील समुद्रकिनारे दाखवत वेधले लक्ष





**मुंबई : प्रतिनिधी**

एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लक्षद्वीप दौऱ्यानंतर सोशल मीडियावर मालदीववर बहिष्कार टाकणारे हॅशटॅग ट्रेंड होत आहेत. अनेक भारतीयांनी आपल्या मालदीवच्या ट्रिपचे प्लॅन्स रद्द केले आहेत आणि लक्षद्वीपकडे अनेकांची पाऊले वळत आहेत. अशातच आता सचिन तेंडुलकरने सोशल मीडियावर आंतरराष्ट्रीय समुद्र किनाऱ्यांच्या तोडीस तोड अशा महाराष्ट्रातील समुद्रकिनाऱ्यावरील सुंदर फोटो शेअर केले आहेत.

सचिन आपला ५०वा वाढदिवस साजरा करण्यासाठी कोकणात भोगवे बीचवर गेला होता, त्या वेळेचे फोटो व व्हिडीओ पुन्हा शेअर करताना त्याने महाराष्ट्रातील निसर्गाचे व कोकणातील आदरातिथ्याचे भरभरून कौतुक केले आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com